BVBK-0402271

हा शोध भारताचा : ७



परचक्राच्या छायेत

BVBK-0402271

# परचक्राच्या छायेत

परकीयांची बुभुक्षित नजर या भूमीला ग्रासू लागली

राजा मंगळवेढेकर

प्रकाशक
ना. गो. जोशी
अतुल बुक एजन्सी
प्रकाशन
३१७ नारायण पेठ,
दै ' प्रभातसमोर ' पुणे - ३०
फोनं - ४४९५४१.

© राजा मंगळवेढेकर
प्रकाशन दिनांक - १५ ऑगस्ट १९८८
(              ) दुसरी आवृत्ती

मुद्रक - प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ,
नागनाथपाराजवळ,
पुणे - ३०.

मूल्य - १००/- रूपये
१० पुस्तकांचा संच

भारत !

पाच सहस्र वर्षांचा स्फूर्तीदायक इतिहास
अभिमानाने सांगणारा हा पृथ्वीच्या पाठीवरला
प्राचीन, विशाल देश !
अनेक मानवसमूह या भूमीवर आले, वसले, नांदले.
अनेक राज्ये-साम्राज्ये उदयाला आली नि मावळली.
विविध संस्कृती, धर्म, पंथ...
विविध साहित्य, संगीत, शिल्प....
विविध शास्त्र, विज्ञान, कला...
किती तरी गोष्टींतून भारताच्या
अस्मितेची जडण-घडण झाली.
एक विदग्ध, सहिष्णू, विजिगीषू
व नित्यनूतन अशी संस्कृतीही
आकारास आली.
अर्वाचीन भारत
अशा गौरवसंपन्न प्राचीन भारताच्या
मजबूत खांद्यावरच उभा आहे.
आणि त्याच प्राचीन भारताच्या
सांस्कृतिक धडपडीचा हा
एक विनम्र शोध !

# अनुक्रम

| | |
|---|---|
| सेनापती पुष्पमित्र | ५ |
| शुंग-वंशातील भारत | ११ |
| काण्व-सातवाहन | २२ |
| खारवेल | ३६ |
| शक | ४१ |
| पल्लव | ५० |
| कुशाण | ५३ |

वा. क्र. २२७१
विषय कथा



# सेनापती पुष्यमित्र

मगधाच्या राजसिंहासनावर पाटलीपुत्रात बृहदश्व अथवा बृहद्रथ हा राजा म्हणून राज्य करू लागला होता. तो स्वतःला परमधार्मिक आणि भगवान बुद्धांचा भक्त समजत होता. अशोकाने सांगितलेला राजधर्म पुढे चालविण्याचा त्याचा इरादा होता. तो शांती, अहिंसा, प्रेम इत्यादी गोष्टी आणि मोठमोठी तत्त्वे तोंडाने बोलत असे. परंतु तो होता मूर्ख आणि भ्याड. अशोकाच्या शांतिधर्माचा तो घोष करीत असे. पण त्याच्या आड दडून तो आपली भीरुता लपवीत असे. राजाच असा दुर्बल असल्यामुळे प्रजाही तशीच बनली होती. सरहद्दीवर तर परक्यांचे हल्ले होऊ लागले होते. अंतर्गत फुटीरपणा माजलेला होताच. हे असेच चालले तर देशावर पारतंत्र्य आल्याशिवाय राहणार नाही, या विचाराने मात्र काही निष्ठावंत मगध-मुत्सद्दी अस्वस्थ बनलेले होते. त्यापैकीच पुष्यमित्र हा एक होता. हा मगधाचा सेनापती होता. तो स्वामिनिष्ठही होता, परंतु त्याच्याने

मगध-साम्राज्याचा होत चाललेला ऱ्हास पाहावेना आणि म्हणून त्याने एक कारस्थानच रचले. बृहद्रथ शांतीपाठ घोकीत विलासात दंग होता. नृत्य-गायनाच्या मैफली चाललेल्या होत्या. त्यानच पुष्यमित्राने एकदा सैन्यमहोत्सवाची योजना केली आणि त्यासाठी बृहद्रथ राजाला निमंत्रित केले. त्याप्रमाणे बृहद्रथ आपल्या सैन्याची पाहणी करण्याकरिता गेला असता, पुष्यमित्राने त्याच्यावर घाव घालून त्याचा वध केला. मौर्य वंशातील हा शेवटचा राजा अशारीतीने संपला.

यापुढे मगधावर शुंगवंशाची सत्ता सुरू झाली.

शुंग-वंशाबद्दल इतिहासामध्ये विविध प्रकारची मते आढळून येतात. ' दिव्यावदान ' नावाच्या बौद्ध-ग्रंथात मौर्य साम्राज्याचा शेवट करणाऱ्या पुष्यमित्राला तो मौर्यवंशातीलच होता, असे म्हटले आहे. काही विद्वानांच्या मते शुंग ही जमात इराणातून आलेली होती. त्यांचे म्हणणे असे की, इराणमध्ये सूर्यपूजा प्रचलित आहे आणि 'मित्र' हे एक सूर्याचे नाव आहे. शुंग वंशातील प्रत्येक राजाच्या नावात ' मित्र ' असा शब्द येतो. पुष्यमित्राच्या मुलांचीच नावे अग्निमित्र, वसुमित्र अशी होती. परंतु केवळ ' मित्र ' या शब्दामुळे त्यांना इराणी समजणे काही विद्वानांना मान्य नाही. उपलब्ध असलेल्या ऐतिहासिक पुराव्यावरून पुष्यमित्र शुंग हा ब्राह्मण होता. ' अष्टाध्यायी ' या ग्रंथाचा कर्ता आणि सुप्रसिद्ध वैय्याकरणी पाणिनी शुंगांना भारतद्वाज गोत्रातील ब्राह्मण मानतात. आश्वलायन श्रौत सूत्रांमध्ये शुंगांना आचार्य म्हटलेले आहे. उपनिषदांमध्येही शुंग कुलाचा उपदेश आढळतो. महाकवी कालिदासाने आपल्या ' मालविकाग्निमित्रम् ' नावाच्या नाटकात अग्निमित्राला बैम्बिक वंशातील आणि काश्यप गोत्राचा दाखविलेला आहे. तिबेटी इतिहासकार तारानाथ याने पुष्यमित्राला ' ब्राह्मण राजा ' असे उल्लेखिलेले आहे. या सर्व पुराव्यांवरून पुष्यमित्र शुंग हा भारतीयच होता आणि ब्राह्मण होता, असेच

मानले जाते.

मग पुष्यमित्राकडून बृहद्रथाची हत्या कशी झाली, असा एक प्रश्न केला जातो. पुष्यमित्राच्या या कृत्याबद्दल बाणभट्टाने पुढे आपल्या हर्ष-चरित्रात त्याला 'अनार्य' असे म्हटलेले आहे. परंतु दुसऱ्या अनेक विद्वानांनी पुष्यमित्राच्या या कृत्याची भलावण केलेली आहे. ब्राह्मणाचे मुख्य कर्तव्य जरी तत्त्वचिंतन, शास्त्राचे अध्ययन आणि आत्मिक विकास साधणे हे असले, तरी प्रसंगी हाती शस्त्र धरणे हे निषिद्ध नाही. भारतीय साहित्यात आणि इतिहासात आवश्यकतेनुसार ब्राह्मणांनी शास्त्राध्ययन सोडून शस्त्राभ्यास स्विकारल्याची अनेक उदाहरणे सापडतात. परशुराम हे एक मोठेच उदाहरण आहे. परशुरामाला ईश्वराचा अवतार मानलेले आहे. तो एक महान पराक्रमी ब्राह्मण योद्धा होता. त्याचप्रमाणे महा-भारतातही द्रोणाचार्य, कृपाचार्य आणि अश्वत्थामा आदी ब्राह्मण योद्धेच होते. देश आणि धर्म यांच्या संरक्षणासाठी सिंधूच्या खालच्या खोऱ्यातील ब्राह्मणांनी ग्रीक आक्रमक सिकंदर याच्याशी टक्कर घेतलेली होती आणि आजूबाजूच्या क्षत्रिय राजांना या परकी विजेत्यांविरुद्ध लढण्यासाठी जागृत केले होते. पुष्यमित्रानेदेखील देशहिताच्या हेतूनेच बृहद्रथाची हत्त्या केली होती; शिवाय बृहद्रथ हा 'प्रतिज्ञा-दुर्बल' राजा होता. म्हणजे कोणत्याही परिस्थितीत सैन्याचा विश्वासघात न करण्याची प्रतिज्ञा बृहद्रथा-कडून सेनापती पुष्यमित्राने आधीच करविली होती. परंतु परकीय हल्ले आणि अंतर्गत अराजकता माजली असतानासुद्धा बृहद्रथ शांतीधर्माच्या नावाखाली सैन्याची उपेक्षा करून देश व प्रजा यांच्या संरक्षणासाठी काहीच उपाय योजीत नव्हता. अशा प्रकारे त्याने प्रतिज्ञेचा भंग केल्या-मुळेच पुष्यमित्राला त्याची हत्या करणे अपरिहार्य झाले. पुष्यमित्र हा ब्राह्मण होता तरी सेनापती होता. क्षात्रतेज त्याने आत्मसात केलेले होते.

अशोकाच्या शांती आणि अहिंसाप्रधान राजधर्माने मानवी इतिहासात

एक नवीन पर्व जरी सुरू केलेले होते, तरी त्याच्यानंतर झालेल्या दुर्बल मौर्य राजांच्या वागणुकीमुळे शांती आणि अहिंसा या तत्त्वांना दुर्बल-पणाचेच स्वरूप प्राप्त झाले होते. त्यामुळे साऱ्या भारतातच क्षात्रतेज, शौर्य, पराक्रम इत्यादी पुरुषार्थी गुणांचा लोप अशोकाच्या शिकवणुकी-मुळे झाला, असा एक आरोपही काहीजण त्याच्यावर करतात. त्याच्या काळीच त्याने बौद्धधर्माला खूपच प्रोत्साहन दिल्यामुळे वैदिक-हिंदुधर्मीय लोक त्याच्यावर रुष्ट झालेले होते. अशोकाने पशुवध बंद केला, त्यामुळे ब्राह्मणांना दुःख झाले होते. कारण त्या काळी यज्ञयागाच्यावेळी पशुवध केला जात असे. बौद्ध धर्माचा पुरस्कार करताना वैदिक धर्मावर साह-जिकच आघात झाले असतील. त्यामुळे वैदिक धर्माभिमानी लोक अशोकाच्या राजधर्माबद्दल मनातून असंतुष्ट असणार. पुष्यमित्राच्या कर्तृत्वाने वैदिक-धर्मी लोकांना दिलासा मिळाला असल्यास नवल नाही.

पुष्यमित्राने शेवटच्या मौर्य राजाची हत्या करून इ. सनापूर्वी १८५ मध्ये आपले साम्राज्य स्थापिले. याचाच एक अर्थ असा की, इतिहासात यावेळी बौद्ध साम्राज्याचा अंत होऊन पुनःश्च ब्राह्मण साम्राज्याची स्थापना झालेली होती.

या वेळी मगध साम्राज्याची स्थिती चिंताजनक अशीच बनलेली होती. आजूबाजूच्या राज्यांनी, तसेच कलिंग, आंध्र आणि महाराष्ट्र या प्रदेशांनी आपले स्वातंत्र्य पुकारून मगध साम्राज्याला एक प्रकारे आव्हानच दिलेले होते. मगधाच्या हातून सरहद्दीवरील प्रदेश दुसऱ्याच्या हातात पडलेले होते. ही सगळी परिस्थिती लक्षात घेवून पुष्यमित्राने प्रथमतः आपली सर्व शक्ती एकवटण्यावर लक्ष केंद्रित केले. प्राची, कोसल, आकर, वत्स आणि अवंती हे जे प्रदेश अद्यापिही मगधाच्या आधीन होते, त्यांना पुष्यमित्राने पुनः संघटित केले आणि त्या प्रदेशावर आपली सत्ता दृढ केली. अवंती हे राज्य पाटलीपुत्रापासून बरेच लांब होते. मौर्य साम्रा-

ज्याच्या अंतानंतर तेथे अराजक माजले होते. तेथील शासनव्यवस्था शिथिल बनली होती. पाटलीपुत्रावरून इतक्या लांबवर अधिकार चालवणे अवघड जात होते. म्हणून पुष्यमित्राने आकर प्रदेशातील विदिशा या नगरीत आपली दुसरी राजधानी स्थापन केली. तेथे अग्निमित्र या आपल्या मुलास राजप्रतिनिधी म्हणून नेमले. अग्निमित्राने अवंतीमधील अराजक मोडून तेथे आपली सत्ता दृढ केली. त्यानंतर पुष्यमित्राने साम्राज्य विस्ताराकडे लक्ष दिले.

प्रथमतःच त्याचा आणि विदर्भातील यज्ञसेन यांचा संघर्ष झडला. महाकवी कालिदासाच्या 'मालविकाग्निमित्रम्' नावाच्या नाटकात या संघर्षाचे विवरण आलेले आहे. त्यावरून असे दिसते की, विदर्भातील राजा यज्ञसेन याने बृहद्रथ राजाचा वध होताच त्या अस्थिर परिस्थितीचा फायदा घेऊन आपले स्वातंत्र्य जाहीर केलेले होते. यज्ञसेन हा आधीपासूनच शुंगांच्या विरोधी होता. कालिदासाने त्याला या नाटकात शुंगांचा स्वाभाविक शत्रू असे म्हटले आहे. यज्ञसेनाचा चुलत भाऊ माधवसेन हा आपल्या भावाला साथ न देता अग्निमित्राचा स्नेही बनला होता. तो विदिशानगरीत जाऊन गुप्तपणे अग्निमित्राला भेटत असे. एकदा असाच तो गुप्तपणे चालला असताना यज्ञसेनाच्या सीमारक्षकांनी त्याला कैद केले. ही वार्ता कळताच अग्निमित्राला राग आला आणि त्याने माधवसेनाला ताबडतोब सोडून द्यावे असा संदेश यज्ञसेनाला पाठविला. यावर यज्ञसेनाने माधवसेनाला एका अटीवर सोडण्याचा वायदा केला. ती अट अशी की, यज्ञसेनाचा साडू जो मौर्यांचा सचिव होता आणि जो पुष्यमित्राच्या कैदेत होता, त्याला तत्काळ मुक्त करावे. ही अट कळताच अग्निमित्राला आणखीनच राग आला आणि त्याने ताबडतोब विदर्भावर आक्रमण करण्याची आज्ञा वीरसेनाला दिली. या युद्धात यज्ञसेनाला आत्मसमर्पण करावे लागले. माधवसेन बंदीगृहातून मुक्त झाला. त्यानंतर

त्या दोघा चुलत भावांमध्ये विदर्भ राज्याची वाटणी करून देण्यात आली. दोघांनीही शुंगाची अधीनता स्वीकारली. अशा प्रकारे दक्षिणापथामधील काही भागावर मगध साम्राज्याची सत्ता पुन्हा प्रस्थापित झाली. पुष्यमित्र आणि त्याचा मुलगा अग्निमित्र या दोघांनी मगध साम्राज्यात आणखीही वाढ केली असती, परंतु त्याच वेळी यवन आक्रमणाचा धोका निर्माण झालेला होता.

□



# शुंग-वंशातील भारत

पुष्यमित्र शुंग याच्या कारकीर्दींतील सर्वांत महत्वाची घटना म्हणून यवनांचे आक्रमण आणि त्याला शुंगांनी केलेला भक्कम विरोध हिचा उल्लेख करता येईल. मौर्य वंशाच्या अस्ताच्या वेळीच भारताची वायव्य सरहद्द धोक्याची बनू लागली होती. तिच्या निकटच 'बाख्त्री' यवनांच्या राज्याची स्थापना झालेली होती. यालाच 'बल्ख' किंवा 'वल्हिक' किंवा 'बॅक्ट्रिया' म्हणून ओळखले जाते. सिकंदरच्या मृत्यूनंतर त्याचे साम्राज्य दुभंगले. त्याच्या साम्राज्यापैकी सर्वांत मोठा भाग त्याचा सेनापती सेल्यूकस याच्या हाती आला. तो सीरियाचा राजा बनला. त्याच्या साम्राज्यविस्ताराच्या तृष्णेमुळे त्याच्यात आणि अॅन्टिगोनस यांच्यामध्ये संघर्ष सुरू झाला. अॅन्टिगोनसची हत्या झाल्यानंतर सेल्यूकस सीरियापासून बॅक्ट्रियापर्यंतच्या प्रचंड साम्राज्याचा सम्राट बनला, परंतु तरीही त्याची सत्तालालसा संपली नाही आणि त्याची दृष्टी भारताकडे

वळली होती. त्यांच्यापैकी डेमेट्रिअस नावाच्या ग्रीक-यवन राजाने भारतावर आक्रमण करून उत्तरेकडील बराच प्रदेश पादाक्रांत केलेला होता. याचा सेनापती आणि जावई मिनॅन्डर म्हणून होता. यांनी इ. स. पूर्वी २०० च्या सुमारास हिंदकुश पर्वत ओलांडून गांधार आणि सरहद्द प्रांतावर सत्ता मिळविली त्यानंतर डेमेट्रिअसने आपल्या सैन्याचे दोन भाग केले; त्यापैकी एक मिनॅन्डरच्या ताब्यात देऊन त्याला पूर्वेकडे मथुरा, पांचाल, साकेत इत्यादीकडून पाटलीपुत्राकडे पाठविले. सैन्याचा दुसरा भाग स्वत: घेवून तो सिंध, सौराष्ट्र जिंकून पत्तन, मध्यमिका या पश्चिम मार्गाने पाटलीपुत्राकडे निघाला. पाटलीपुत्र हे त्याकाळी भारतीय सत्तेचे प्रमुख केंद्र असल्यामुळे त्याच्यावर ताबा मिळविण्याची इच्छा या परदेशी आक्रमकांनाही स्वाभाविकपणेच होती. मगध साम्राज्यात पाटलीपुत्राच्या नजिक डेमेट्रिअसने काही प्रदेश जिंकला होता परंतु तेथील प्रजेतील असंतोषामुळे त्याला आपला पाय तेथे रोवता आला नाही. इकडे डेमेट्रिअस भारतात लांववर गेलेला पाहून बॅक्ट्रियातील असंतुष्ट ग्रीक प्रजेने बंड उभारले आणि युक्रेटाइडिज याने सत्ता हाती घेतली. ही वार्ता कळताच डेमेट्रिअस तातडीने तिकडे परतला, परंतु त्याला बॅक्ट्रियावर परत सत्ता मिळवता आली नाही. तेव्हा डेमेट्रिअसने भारताच्या पश्चिमोत्तर प्रदेशावर राज्य करण्याचे ठरविले. यूक्रेटाइडिजनेही भारतावर आक्रमण केले होते आणि त्याने हजार नगरे जिंकून घेतली होती, अशी वर्णने आढळतात. परंतु या दोन्ही ग्रीक-यवन राजकुलांनी पंजाबमध्ये राज्य केले होते असे निश्चित मानले जाते. 'शाकल' म्हणजेच आजचे सियालकोट याला 'यूथिडेमिया' असे नाव देऊन तिथे डेमेट्रिअसने आपली राजधानी स्थापन केलेली होती, आणि सिंध, त्याच्याजवळील प्रदेश व पूर्व पंजाब या भागांवर याचे राज्य होते. बॅक्ट्रिया, काबूल, गांधार आणि पश्चिम पंजाब या भागावर यूक्रेटाइडिज याचे राज्य होते. डेमेट्रिअसच्या निधना-

नंतर मिनॅन्डर हा पूर्व पंजाबचा राजा बनला आणि शाकल येथेच त्याने आपली राजधानी ठेवली.

डेमेट्रिअसला ‘ रेक्स इन्डोरम ’ म्हणजेच ‘ भारतीयांचा राजा ’ असे प्राचीन ग्रीक साहित्यात म्हटलेले आहे. यावरूनच त्याचा भारताशी किती घनिष्ठ संबंध आलेला होता हे दिसून येते. डेमेट्रिअस हाच पहिला ग्रीक राजा होता की ज्याने ग्रीक आणि खरोष्ट्री लिपीतील भारतीय अशा दोन्ही भाषांतील नाणी राज्यकारभारात वापरात आणली. डेमेट्रिअसने भारतामध्ये स्थापन केलेल्या राज्यामुळे १५० वर्षांच्या शासनकालात भारतीय विचारांवर ग्रीक संस्कृतीचा बराच प्रभाव पडला. नाणी तयार करणे, ज्योतिष, साहित्य, कला इत्यादी क्षेत्रांमध्ये भारतीय आणि ग्रीक या दोन्ही संस्कृतींचा एकमेकांवर प्रभाव पडलेला होता. मूर्तीकलेमध्ये गांधार शैलीचा जन्म ही या संपर्काचीच निष्पत्ती होती. अनेक ग्रीकांनी —यांनाच यवन असे म्हणत असत—भारतीय नावे धारण केली होती. भारतीय धर्मांची दीक्षाही घेतली होती आणि यथाकाल ते भारतीय जीवनाशी मिळून मिसळूनही गेले होते. या संपर्कामुळे काही स्वतंत्र ग्रीक नगरे वसली, तर काही हिंदू नगरांमधून ग्रीक मोहल्ले वसले; यामुळे दोन्हीही संस्कृतींची अभिवृद्धीच झाली.

पुष्यमित्राच्या कारकीर्दीत ग्रीक-यवनांनी जोरदार तयारीनिशी भारतावर आक्रमण केले होते. या आक्रमणाचा उल्लेख पतंजलीच्या ‘ महाभाष्य ’ आणि ‘ गार्गीसंहिता ’ या ग्रंथांमधून आढळतो. तिबेटी इतिहासकार तारानाथ यानेही पुष्यमित्राच्या काळी भारतावर विदेशी यवनांचे आक्रमण प्रथमतः झालेले होते, असे म्हटले आहे. पतंजली हा पुष्यमित्राचा समकालीन होता. त्याने आपल्या ग्रंथात ‘ अनद्यतन भूत क्रिया ’ याचे उदाहरण देताना या आक्रमणाचा उल्लेख केलेला आहे : ‘ अरुणाद् यवनः साकेतम ’ ( ग्रीकांनी साकेतला वेढले ), ‘ अरुणाद् यवनो माध्यमिकाम ’

(ग्रीकांनी माध्यमिका घेरली) त्याचप्रमाचे गार्गीसंहितेमध्ये देखील 'दुष्ट विक्रांत यवनांनी' मथुरा, पांचालदेश (गंगेचे खोरे) आणि साकेत जिंकून ते कुसुमध्वज म्हणजे पाटलीपुत्राकडे गेले. परंतु ग्रीकांना पाटली-पुत्रापासून परत फिरावे लागले.

ग्रीकांच्या या आक्रमणांबद्दल विद्वानांमध्ये कालाच्या दृष्टीने मतभेद आहेत. काहींचे म्हणणे असे आहे की, पुष्यमित्र हा जेव्हा मौर्यांचा सेनापती होता, तेव्हा पाटलीपुत्रावर हे आक्रमण केले असावे. तर काहींचे म्हणणे असे आहे की, पुष्यमित्राने मगधाची सत्ता हाती घेतल्यानंतरच्या काळात पुष्यमित्राला दोन ग्रीक आक्रमणांना तोंड द्यावे लागले होते. पहिले आक्रमण मौर्य वंशाच्या पतनाच्या वेळीच झाले होते आणि दुसरे पुष्य-मित्राच्या उत्तरकालात झाले होते. 'मालविकाग्निमित्रम्' या कालिदासाच्या नाटकात या दुसऱ्या आक्रमणाचे विवरण आहे. या आक्रमणाचे वेळी पुष्यमित्राचे पौत्रही एवढे मोठे झाले आहेत की, त्यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील सैन्ये युद्धावर पाठविली जात होती. आणि त्यांच्या पराक्रमांची बरीच प्रशंसा या नाटकात केलेली आहे. या दुसऱ्या ग्रीक युद्धाचा संबंध पुष्यमित्राने केलेल्या अश्वमेध यज्ञाशी आहे. पुष्यमित्राने आपल्या वृद्धपणी असा यज्ञ केला होता. कालीदासाने पुष्यमित्राचा नातू कुमार वसुमित्र आणि एक ग्रीक सरदार यांच्यातील संघर्षाचा उल्लेख केलेला आहे. अश्वमेधाच्या अश्वाचे संरक्षण करण्यासाठी बरोबर मोठे सैन्य घेऊन वसुमित्र सर्वत्र संचार करीत होता. त्या वेळी एका ग्रीक सरदाराने अश्वमेधाचा घोडा पकडला आणि बांधून ठेवला. वसुमित्राच्या सैन्याला त्याने सिंधूनदीच्या दक्षिण तटावरच रोखून धरले. त्यावरून हा संघर्ष झडला आणि त्या युद्धात वसुमित्राने ग्रीकांचा पराभव केला. अश्वमेधाचा अश्व सोडवून परत आणला.

विद्वानांच्या मते, पहिल्या अक्रमणाचा नेता डेमेट्रिअस हा होता आणि

दुसऱ्या आक्रमणाचा नेता मिनॅण्डर होता.

आपल्याला लाभलेल्या विजयाप्रित्यर्थ पुष्यमित्राने अश्वमेध यज्ञ करण्याचा निश्चय केला. या यज्ञाने त्या काळी लुप्त झालेल्या ब्राह्मण परंपरेचाही त्याने पुनरुद्धार केला. पतंजलीचे महाभाष्य, कालिदासाचे मालविकाग्निमित्रम् आणि अयोध्येमधील पुष्यमित्राचा एक शिलालेख यांमधून या अश्वमेध यज्ञाचा उल्लेख आढळतो. महाभाष्यात पतंजलीने लिहिले आहे, 'इह पुष्यमित्रम् याजयामः' (येथे आम्ही पुष्यमित्राचा यज्ञ करीत आहोत.) या उल्लेखावरून काही गोष्टी सिद्ध होतात. एक म्हणजे पतंजली हा पुष्यमित्राचा समकालीनच होता. दुसरे म्हणजे पुष्यमित्राने अश्वमेध केला होता. तिसरी गोष्ट म्हणजे त्या यज्ञात पंतजली स्वतः ऋत्विज बनला होता. आणि चवथी गोष्ट म्हणजे महाभाष्याची रचना पाटलीपुत्रामध्ये पुष्यमित्राच्या आश्रयाखाली झाली होती. अयोध्येमधील लेखावरून पुष्यमित्राने एक नव्हे तर दोन अश्वमेध यज्ञ केले होते असे कळते.

अश्वमेध यज्ञाचे अनुष्ठान राज्यविस्तार आणि दिग्विजय प्राप्त करण्यासाठी मानले जात असे. या यज्ञाचे वेळी राजा दीक्षित होऊन यज्ञशाळेत प्रवेश करतो आणि यज्ञअश्वाची पूजा करून त्याला स्वच्छंदपणाने कोठेही फिरण्यासाठी म्हणून राज्याच्या सीमेवर आणून सोडतो. त्या यज्ञअश्वाच्या पाठोपाठ प्रबल सैन्यही ठेवलेले असे. ज्या राज्यातून हा घोडा कसलीही अडचण न येता पार जातो ते राज्य अश्वमेध करणाऱ्या राजाच्या अंकित मानले जाते. परंतु जो राजा स्वतःला समर्थ समजून यज्ञाचा घोडा बांधून ठेवतो त्याला युद्ध करावे लागते. अशा प्रकारे सर्वत्र हा घोडा परत फिरून आल्यानंतर राजा अश्वमेध यज्ञ करतो. अशा प्रकारचा यज्ञ करणाऱ्या राजाला त्या काळी फार मोठी प्रतिष्ठा आणि कीर्ती लाभत असे.

भारतामधील ग्रीक सत्तेचे उच्चाटन, मौर्य वंशाचा निःपात आणि बौद्ध

मताचे खंडन पुष्यमित्राने केले. आणि त्या विजयासाठीच त्याने अश्वमेध यज्ञ केला होता. अशा महान विजयानंतर अश्वमेध यज्ञ करण्याची प्रथा त्या काळी होती. या यज्ञाने पुष्यमित्राने एका धार्मिक क्रांतीलाही प्रतिष्ठित बनविले होते. मौर्य कुळातील राजे क्षत्रिय होते आणि ते बौद्ध अथवा जैन धर्माचे अनुयायी होते. पुष्यमित्राने त्यांच्या ठायी ब्राह्मण राज्याची आणि धर्माची प्रतिष्ठापना केली. त्याच्याविरुद्ध बौद्धांनी अनेक कारस्थाने केली, परंतु पुष्यमित्राने त्यांचा बीमोड केला. त्याचबरोबर पुष्यमित्राने ब्राह्मणधर्म, साहित्य आणि संस्कृती यांचीही प्रतिष्ठापना करून धर्मक्रांतीला चिरस्थायी आशय प्राप्त करून दिला, पतंजलीच्या सहाय्याने पुष्यामित्राने घडवून आणलेली क्रांती ही ब्राह्मण संस्कृती व धर्म यांना पुनश्च प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याच्या उद्देशानेच केलेली होती. ब्राह्मण धर्मातील विधी–क्रिया पुनःश्च सुरू केल्या, लुप्त अश्वमेधाचे पुनःश्च आयोजन केले. पालीच्या ठिकाणी संस्कृत भाषेला राजपद दिले आणि वर्णव्यवस्थेची पुनःश्च स्थापना करून मनुस्मृतीची प्रतिष्ठा वाढविली. पतंजलीने पाणिनीच्या सूत्रावर टीका लिहिताना आपल्या महाभाष्यामध्ये या ब्राह्मणी राज्याला ‘ आदर्श राज्य ’ असे म्हटलेले आहे.

अशा प्रकारची धर्मक्रांती केली तरी पुष्यमित्र हा सर्वथा असहिष्णु नव्हता. बौद्धविरोधाचे खंडन केल्यावर आणि ब्राह्मण धर्माचे पुनरुज्जीवन झाल्यावर त्याने शांतीने राज्यकारभार करण्यास सुरुवात केली होती. त्याच्याच काळात मारहुत येथील बौद्ध-स्तूपाची निर्मिती झाली होती. पुष्यमित्राने काही बौद्धभिक्षूंची कत्तल केली होती आणि काही बौद्ध विहारांचा विध्वंस केला होता हे खरेच आहे; परंतु त्याला बौद्ध धर्मा-विषयी किंवा जनतेविषयी एवढी घृणा वाटत होती म्हणून नव्हे, तर काही बौद्ध भिक्षू आणि विहार हे पुष्यमित्राला विरोध करण्यासाठी म्हणून परक्या ग्रीकांशी संगनमत करून कट कारस्थाने करू लागले होते.

बौद्धांच्या या राष्ट्रविरोधी कृत्यामुळे पुष्यमित्राने त्यांना जबर शिक्षा ठोठावल्या आणि एक प्रकारची दहशत निर्माण केली.

पुष्यमित्राचे राज्य दक्षिणेला नर्मदा नदीपर्यंत पसरलेले होते. दक्षिण प्रांतांची राजधानी विदिशा येथे होती. तेथूनच विदर्भ राज्यावर नियंत्रण ठेवले जात होते. वायव्येला पंजाबमध्ये जालंदर आणि सियालकोटपर्यंत त्याचा राज्यविस्तार झालेला होता. पाटलीपुत्राच्या सभोवतालचा सर्व प्रदेश आणि बंगालमध्ये समुद्रकिनाऱ्यापर्यंतचा सर्व प्रदेश त्याच्या अधिकाराखाली होता. आजचा बिहार, उत्तर प्रदेश, बुंदेलखंड इत्यादी प्रदेशांवरही त्याची सत्ता चालत होती. त्याने आपली मुख्य राजधानी पाटलीपुत्र येथेच ठेवली होती. अशा प्रकारे उत्तरेस सिंधू नदापासून दक्षिणेस विदर्भापर्यंत त्याचे साम्राज्य पसरलेले होते. सुमारे छत्तीस वर्षे राज्य केल्यानंतर इ. स. पूर्व १४८ मध्ये पुष्यमित्राचे निधन झाले. त्या वेळी तो ८० वर्षांचा होता. पुष्यमित्राच्या जीवनाचा पूर्वार्ध रक्तरंजित आहे, परंतु उत्तरार्ध शांती आणि सुरक्षामय आहे. धार्मिक आणि राजकीय दृष्टीने त्याने आपल्या जीवनात केलेले कार्य असाधारण मानले जाते. दोन संस्कृतींच्या संघर्षामधून त्याने आपला धार्मिक आणि सामाजिक दृष्टिकोन ज्या रीतीने सुप्रतिष्ठित केला, ते कार्य साम्राज्यस्थापनेहूनही श्रेष्ठ दर्जाचे मानले जाते. त्याने एका नवीन ब्राह्मण-व्यवस्थेचे संघटन केले, त्यामुळे ब्राह्मण धर्माचा पुनरुद्धार झाला आणि त्याला प्रतिष्ठा मिळाली. ग्रीक साम्राज्यशाहीला याच्या पराक्रमामुळेच पायबंद बसला. पुष्यमित्राने गाजविलेल्या पराक्रमाला त्याच्या सेनेने योग्य साथ देऊन त्याच्याविषयीची अलौकिक अशी स्वामिभक्ती प्रकट केली होती. पुष्यमित्रालाही याची चांगली जाण होती; म्हणून त्याने स्वतः ‘राजा’ असे बिरुद न लावून घेता अखेरपर्यंत तो स्वतःला ‘सेनापती’ म्हणून घेत असे. सम्राटाचे सर्व गुण त्याच्यात होते. त्याचे कार्यही तसेच अजोड होते. परंतु तरीही त्याने

स्वतःला सेनापती म्हणवून घेण्यातच गौरव मानला, यात त्याचे व्यक्ति-वैशिष्ठ्य जसे दिसून येते, तसे स्वतःच्या सैन्याबद्दल अपार प्रेमही व्यक्त होते. भारतातील साम्राज्य-निर्मात्यांमध्ये पुष्यमित्राचे नाव चिरकाल राहील; आणि विशेषतः त्याने प्रथमतःच ब्राह्मण-साम्राज्याची प्रतिष्ठापना केली म्हणून इतिहासात त्याला वेगळे स्थान दिले जाईल.

पुष्यमित्राच्या पश्चात त्याचा मुलगा अग्निमित्र राज्यावर आला. हा अग्निमित्रच कालिदासाच्या नाटकाचा नायक आहे. तो विदिशा येथे राज्य-प्रतिनिधी म्हणून होता. राजा झाल्यानंतर त्याच्या कारकीर्दीत कसलीही महत्त्वाची घटना घडली नाही. परंतु त्याने पुष्यमित्राचे साम्राज्य व्यव-स्थितरीत्या सांभाळले.

अग्निमित्रानंतर त्याचा भाऊ सुजेष्ठ हा मगधाच्या गादीवर बसला. याच्याही कारकीर्दीत काही विशेष घटना घडली नाही. त्याच्यानंतर अग्निमित्राचा शूरपुत्र वसुमित्र हा मगध सिंहासनावर बसला. यानेच सिंधू नदीच्या दक्षिण किनाऱ्यावर ग्रीक सेनेला पराजित केले होते. हर्षचरिताचा लेखक बाणभट्ट याने असे लिहिले आहे की, वसुमित्र हा नाट्यकलेचा मोठा रसिक होता. मित्रदेव नावाच्या एक व्यक्तीने अभिनेत्यांच्यामध्ये लपून वसुमित्राचा शिरच्छेद केला होता.

वसुमित्रानंतर ओद्रक नावाचा राजा झाला. याचा उल्लेख कौशाम्बि पभोसा येथील शिलालेखांमध्ये आढळतो. शुंग वंशातील राजा भागवत अथवा भागभद्र याच्या कारकीर्दीत तक्षशिला येथील ग्रीक राजा ॲन्टिलिकित याने दियानचा पुत्र हेलिओदरस याला आपला राजदूत म्हणून त्याच्या राज्यसभेत पाठविले होते. या घटनेवरून हे सिद्ध होते की, या काळीही शुंग वंशाची शक्ती घटलेली नव्हती आणि ग्रीक राजाही भागभद्र राजाशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करू इच्छित होता. हेलिओदरसने स्वतःला भागवतधर्मी असे म्हणवून घेतले आहे. विदिशानगरीमध्ये त्याने

वासुदेवाच्या आराधनेप्रीत्यर्थ गरुडध्वजाची स्थापना केली होती. शुंग वंशातील शेवटचा राजा देवभूती नावाचा झाला. विष्णू पुराणांमध्ये असे म्हटले आहे की, त्याचा मंत्री वसुदेव कण्व याने त्याचा वध केला आणि तो स्वतःच राजा बनला.

शुंग वंशाच्या कारकीर्दीत ब्राह्मण धर्माची उन्नती झाली. कला आणि संस्कृतीचा विकास झाला. या दृष्टीने भारतीय इतिहासात शुंग वंशाला महत्त्वपूर्ण असे स्थान आहे. शुंगकालीन संस्कृती ही भविष्यातील गुप्त-कालीन भारतीय संस्कृतीची पहाटच होती. पुष्यमित्र आणि त्याच्यानंतरचे शुंग राजे यांनी अशोकाच्या पूर्वकालीन मगध साम्राज्याची वाढच केली. धर्मविजयाच्या प्राप्तीचे साधन युद्धाविषयी घृणा हे नसून सैन्याचे संघटन हे आहे. असे समजण्यात येऊ लागले. राजनीतीचे स्वरूप स्पष्ट झाले. शुंग कालामध्ये कलेचाही बराच विकास झाला होता. तत्कालीन जनतेचे मानस, सांस्कृतिक आदर्श आणि परंपरा यांचे प्रतिबिंब शुंगकालीन कलेमध्ये उमटलेले दिसते. जनजीवनाचे यथार्थ चित्रण या कलेत दिसते. भरहूत येथील स्तूपामध्ये दोन हजार वर्षांपूर्वीच्या भारतीय जीवनाचे चित्रण आढळते. लोकांची घरे, देवांच्या मूर्ती, साधूंचे आश्रम, त्याचप्रमाणे गाड्या, रथ, नौका, वेशभूषा, शस्त्रे, अलंकार इत्यादींचे चित्रणही केलेले आहे.

या कालखंडाविषयी लिहिताना पं. जवाहरलाल नेहरू यांनी लिहिले आहे की, “अशोकाच्या मृत्यूनंतर मौर्यांचे साम्राज्य फार काळ टिकले नाही. काही वर्षांतच ते विरून गेले. उत्तरेकडील प्रांत साम्राज्यातून एक एक फुटून गेले आणि दक्षिणेकडे एक नवीनच सत्ता निर्माण झाली. ही आंध्राची सत्ता होय. त्या मावळत्या साम्राज्यावर अशोकाच्या वंशजांनी पुढे पन्नास एक वर्षे राज्य केले; परंतु शेवटी त्यांचाच एक प्रमुख सेना-पती ब्राह्मणवर्णीय पुष्यमित्र याने जबरदस्तीने त्यांना राज्यावरून उडवून लावले. त्यानंतर त्याने स्वतःलाच राज्याभिषेक करून घेतला व त्यामुळे

त्याच्याकाळी काही काळ ब्राह्मण धर्माला पुनर्जीवन प्राप्त झाले. ब्राह्मण धर्माने बुद्ध धर्मावर जो हल्ला केला, तों आडमुठेपणाने न करता मोठ्या कौशल्याने आणि हिकमतीने—कोणाला नीट समजणारसुद्धा नाही अशा रीतीने केला. त्यांचा छळ करावयाचा असा त्यांनी फारसा दडपेगिरीचा प्रयत्न केला नाही. काही थोडाफार छळ अर्थातच झाला, पण तो राजकीय स्वरूपाचा होता. धार्मिक स्वरूपाचा नव्हे. बुद्धधर्मियांचे जे मोठे मोठे संघ होते ते फारच प्रबळ होते. आणि त्यांच्या राजकीय सामर्थ्याबद्दल राजे लोकांना पुष्कळसे भय वाटे. यासाठी त्यांचे हे सामर्थ्य कमी करण्याचा प्रयत्न असे राजे करीत. परंतु शेवटी ब्राह्मण धर्माने बुद्ध धर्माला त्याच्या या जन्मभूमीतून जवळजवळ जे पार नाहीसे करून टाकले, ते काही अंशी त्याचा आपला एकजीव करून आणि त्यातील काही तत्त्वे आत्मसात करून; म्हणजेच आपल्या घरातच त्याला थोडी फार जागा देऊन, त्याला आपलासाच करून!

"अशा तऱ्हेने जो ब्राह्मण धर्म पुनः प्रस्थापित झाला तो काही अगदी जसाच्या तसा पहिलाच ब्राह्मणधर्म नव्हता किंवा बुद्धधर्माने जे जे काही केले त्या सगळ्याचाच काही त्यात अभाव किंवा विच्छेद नव्हता. ब्राह्मण धर्माचे प्राचीन काळचे नेते हे फारच हुशार आणि चतुर लोक होते; आणि नवीन नवीन गोष्टी आत्मसात करण्याचे, आपल्यामध्ये मिसळून घेण्याचे कौशल्य त्यांना फार पहिल्यापासून साधले गेले होते. आर्य लोक प्रथम हिंदुस्थानात आले तेव्हा त्यांनी द्रवीड लोकांची संस्कृती व आचारविचार यांपैकी पुष्कळ भागाचा आपल्यात समावेश करून घेतला. त्यांच्या पहिल्यापासूनच्या इतिहासात, जाणून किंवा अजाणता असेल, पण त्यांचा नेहमीचा हा परिपाठ चालत आलेला आहे. बुद्ध धर्माच्या बाबतही त्यांनी असेच केले. हिंदू लोकांच्या धर्मात अवतारांची मोठी मालिका आहे, देवदेवतांचे प्रचंड भांडार आहे; त्यामध्येच एका

अवताराची जागा त्यांनी बुद्धाला देऊन टाकली. लोकसमाजाला बुद्ध हा एक पूजेचा आणि भक्तीचा विषय त्यांनी करून ठेवला. पण त्याने जो विशेष धर्मसंदेश म्हणून सांगितला होता, तो मात्र हळूच बाजूस सारून काही लहानसहान प्रकारांनिशी ब्राह्मण धर्माच्या किंवा हिंदू धर्माच्या आचारविचारांचा पूर्वीचाच ओघ पुन: आपला जसाच्या तसा संथपणे, अखंडपणे वाहू लागला. बुद्धधर्माच्या ब्राह्मणीकरणाची क्रिया पूर्ण होण्याला बराच दीर्घकाळ लागलेला आहे..."

□

# काण्व–सातवाहन

जे बृहद्रथ या अंतिम मौर्य नरेशाच्या बाबतीत घडले, तेच देवभूती या शुंग वंशातील नरेशाच्या बाबतीत घडले. इतिहासाची पुनरावृत्ती येथेही झालेली दिसते. बृहद्रथाचा वध करून शुंग वंश सत्तेवर आला, तर देवभूतीचा वध करून कण्व अथवा काण्व वंश राज्याधिष्ठित झाला. विष्णू पुराणामध्ये असा उल्लेख आहे की, देवभूती या शुंग राजाची हत्या त्याचाच प्रधान वसुदेव काण्वाने केली. येथूनच काण्वांचा शासन-काल सुरू झाला. याला ' काण्वायन ' असेही म्हणतात. परंतु हे काण्वा-यन काही फार काळ चाललेले नाही. इ. सनापूर्वी ७२ मध्ये शुंग वंशाचा नाश करून सुरू झालेले हे काण्वायन इ. स. पूर्वी ३० मध्येच संपुष्टात आलेले होते, म्हणजे केवळ पंचेचाळीस वर्षे काण्वांनी राज्य केले. वसुदेव काण्वाने देवभूती शुंगाची हत्या केली याचा उल्लेख बाणभट्टाच्या ' हर्षचरिता 'मध्ये आलेला आहे. विष्णू पुराणात देवभूती शुंग हा अति

व्यसनी आणि अति कामी होता, असे सांगितलेले आहे.

काण्व वंश हा ब्राह्मण वंशच होता. काण्वायन हे त्याला मिळालेले नाव त्याच्या गोत्रावरून मिळाले असण्याची शक्यता आहे. ४५ वर्षांच्या कारकीर्दीत चार काण्व राजे होऊन गेले. त्यांत वसुदेवाने नऊ वर्षे, भूमीमित्राने चवदा वर्षे, नारायणाने बारा वर्षे आणि सुशर्मा याने दहा वर्षे राज्य केले. पुराणांमध्ये कण्व-वंशातील राजे धर्मानुकूल शासन करतील अशी भविष्यवाणी दिलेली आहे. याचा अर्थ इतकाच दिसतो की, शुंग राजांप्रमाणेच काण्व राजांनीही ब्राह्मण धर्माच्या पुनरुद्धाराची नीती पुढे चालू ठेवली होती. परंतु काण्व वंशातील एकाही राजाच्या हातून घडलेली महत्त्वपूर्ण घटना प्राचीन इतिहासात नमूद नाही.

इ. स. पूर्व ३० च्या सुमारास आंध्र अथवा आंध्रभृत्य यांनी काण्व वंशाचा शेवट केला. वायू पुराणात असे म्हटले आहे की, ‘ आंध्र नरेश सिमुक अथवा सिन्धुक याने सुशर्मा काण्वायन आणि शुंगांची शेषशक्ती नष्ट करून पृथ्वीचे राज्य प्राप्त केले. ’

काण्व वंशानंतर आंध्र–सातवाहनांची कारकीर्द सुरू झाली. पुराणामध्ये सातवाहन वंशातील राजांना आंध्र किंवा आंध्रभृत्य असे म्हटलेले आहे. परंतु या वंशातील राजांनी मात्र स्वतःला ‘ सातवाहन ’ असे म्हणवून घेतले आहे. प्राचीन साहित्यामध्ये काही ठिकाणी या वंशाला ‘ शालिवाहन ’ या नावानेही संबोधिलेले आहे. आंध्र लोकांसंबंधी अशी एक आख्यायिका प्रचलित आहे की, विश्वामित्राला एकशे एक मुले होती. त्यांपैकी मधुच्छंद हा मधला होता. पन्नास मधुच्छंदाहून मोठी आणि पन्नास लहान होती. विश्वामित्राने एकदा शुनःशेपाला हरिश्चंद्राच्या यज्ञातून सोडवून आणले. आपल्याकडे ठेवून घेतले. त्याचे ‘ देवरात ’ असे नामकरण केले. त्याला मुलगा मानले.

विश्वामित्राने देवराताला आपला ज्येष्ठ बंधू म्हणून मान द्यावा असे

आपल्या मुलांना सांगितले, तेव्हा वडील पन्नास मुलांनी या गोष्टीला नकार दिला. याचा विश्वामित्राला राग आला आणि त्याने त्यांना 'तुम्ही म्लेंच्छ–शूद्र व्हाल' असा शाप दिला. धाकट्या पन्नास जणांनी त्याचे ऐकले, म्हणून त्यांना त्याने आशीर्वाद दिला.

विश्वामित्राच्या शापामुळे थोरल्या पन्नास जणांची संतती आंध्र, पुंड्र, अश्व, शबर, पुलिन्द, मूतिव आदी दस्यू बनली.

अशा प्रकारे 'ऐतरेय ब्राह्मण' नामक ग्रंथात आंध्र लोकांचा उल्लेख प्रथम आढळतो.

सातवाहन स्वतःला ब्राह्मण म्हणवून घेत असत आणि ते महाराष्ट्रातील रहिवासी होते. त्यांनी आपल्या राज्याची संस्थापना महाराष्ट्रात केली आणि आंध्रचा प्रदेश आपल्या राज्यात सामर्थ्याच्या बळावर घेतलेला होता. परंतु पुढे काही काळानंतर शक–आभिर यांची आक्रमणे झाली आणि सातवाहनांची सत्ता केवळ आंध्र प्रदेशापुरतीच मर्यादित राहिली. त्यामुळेच त्यांना आंध्र म्हटले जाऊ लागले.

नासिक येथील एका शिलालेखात सातवाहन वंशातील एक राजा गौतमीपुत्र सातकर्णी याला 'एक ब्राह्मण' असे विशेषण लावलेले आहे. त्याला क्षत्रियांचा गर्व आणि मान मर्दन करणारा म्हणजेच परशुरामासमान उल्लेखिलेले आहे. सातवाहन राजांना 'गौतमी' आणि 'वासिष्ठिपुत्र' असे म्हटले आहे. गौतम आणि वसिष्ठ ही दोन्हीही गोत्रांची नावे असून ती ब्राह्मण नावे आहेत.

सातवाहन वंशामध्ये एकोणीस राजे झाले आणि त्यांनी सुमारे तीन शतके राज्य केले, असे वायू पुराणात म्हटले आहे; तर मत्स्य पुराणात तीस सातवाहन राजांचा उल्लेख असून त्यांनी सुमारे चार शतके राज्य केले, असे म्हटले आहे. विद्वानांच्या मते सातवाहन वंशाच्या दोन शाखा असाव्यात; एक मूळ शाखा आणि दुसरी उपशाखा. मूळ शाखेत एकोणीस

राजांनी तीन शतके राज्य केले असावे आणि त्यांच्या व्यक्तिरिक्त उपशाखेतील राजांनी आणखी काही काळ राज्य केले असावे आणि या दोन्ही शाखांतील तीस राजांनी मिळून चार शतके राज्य केले असावे.

ज्या सिमुक नावाच्या राजाने काण्व राजवंश नष्ट केला, तोच सातवाहन कुलातील प्रथम राजा होता. याचे राज्य दक्षिणापथात होते आणि याची राजधानी 'प्रतिष्ठान' म्हणजे आजचे पैठण येथे गोदावरीच्या काठी होती. सिमुक राजाला पुराणांमध्ये सिन्धुक, शिशुक, शिप्रक आणि भृत्य असेही म्हटलेले आहे. याने सुमारे २४ वर्षे राज्य केले होते.

सिमुक राजानंतर त्याचा भाऊ कृष्ण अथवा कन्ह हा गादीवर आला. याच्या कारकीर्दीत सातवाहन साम्राज्याची वाढ झाल्याचा पुरावा आढळत नाही. नासिक येथील एका शिलालेखावरून एवढेच कळते की, याच्याकाळी एका श्रवण महामात्राने तेथे एक गुहा निर्माण केलेली होती. यावरून या राजाचा अधिकार नासिकपर्यंत होता हे उघड होते.

कृष्ण राजानंतर सिमुक राजाचा पुत्र शातकर्णी सातवाहन हा राजा झाला. सातवाहन वंशातील हा तिसरा राजा एक महान विजेता आणि प्रतापी राजा म्हणून विख्यात झाला. याने सैन्यबळावर वैवाहिक संबंध स्थापन करून आपले राज्य सुदृढ करण्याकडे लक्ष दिले होते. नायानिका येथील नानाघाटामधील शिलालेखांमध्ये शातकर्णी राजाच्या विजयाचे वर्णन केलेले आहे. त्याला सिमुक वंशातील 'धन' असे म्हटले आहे. त्याने महाराष्ट्रातील महारथीच्या कन्येशी विवाह करून आपल्या राजकीय प्रवाहामध्ये वाढ केली होती आणि जवळजवळ संपूर्ण दक्षिणापथाचा तो अधिकारी बनला होता. या शिलालेखात त्याला 'अप्रतिहतदक्षिणापथप्रति' असे म्हटले आहे. त्याने माळवा प्रांतावरही सत्ता केली होती आणि दोन वेळा अश्वमेध यज्ञ करून ब्राह्मण धर्माविषयीची आपली श्रद्धा व्यक्त केली होती. वरील शिलालेखातही त्याने

दोन वेळा केलेल्या अश्वमेध यज्ञाचा उल्लेख आहे. यावेळी त्याने असंख्य गाई, अश्व, गज, ग्राम, सुवर्ण आणि अन्य वस्तूंचे दान केले होते. पुराणांमध्ये असे भविष्यकथन आढळते की, ही पृथ्वी शुंग व काण्व राजांच्या हातून आंध्र जातींच्या सत्तेखाली जाईल.

या बलवान राजालाही आपल्या समकालीन अशा एका राजाशी सामना द्यावा लागला होता. कलिंगचा राजा खारवेल याच्या हाथीगुंफा येथील एका लेखावरून लक्षात येते की, शातकर्णीच्या सामर्थ्याला तुच्छ समजून खारवेल राजाने मुसिक नगरावर आक्रमण केले होते आणि शातकर्णीचे वैर ओढवून घेतले होते. परंतु याचा परिणाम सातवाहन वंशावर काहीही झाला नाही किंवा त्याच्या गौरवाला थोडाही धक्का पोचला नाही. खारवेल राजाची शक्ती मात्र टिकू शकली नाही. आणि शातकर्णीचा गौरव मात्र पूर्वीप्रमाणेच पुढे टिकून राहिला. परंतु शातकर्णीच्या पश्चात मात्र सातवाहन वंशाचा इतिहास काहीसा अंधः-कारमय झालेला दिसतो.

शातकर्णीच्या मृत्यूनंतर त्याची राणी नायायिका हिने साम्राज्याचा भार आपल्यावर घेतला होता. ही अंगीय वंशातील महारथी द्रणकईरो याची मुलगी होती. हिला शक्तीश्री आणि वेदश्री या नावाचे दोन पुत्र होते. परंतु शातकर्णीच्या मृत्यूसमयी ते अल्पवयीन असल्यामुळे राणीला राज्यभार आपल्या हाती घ्यावा लागला होता. त्यानंतर या वंशातील १७ अन्य वंशांतील राजांनी राज्य केले, असे पुराणात म्हटले आहे. परंतु हा काळ सातवाहन वंशाच्या अवनतीचाच होता. याच काळात सातवाहनांच्या राज्यावर शकांचे आक्रमण झाले आणि महाराष्ट्रभर शकांची सत्ता नांदू लागली. कल्याण आणि सोपारा ही त्या काळात व्यापारासाठी प्रसिद्ध अशी बंदरे होती; तीही शकांच्या हाती पडली. महाराष्ट्रावरील सत्ता गेल्यावर सातवाहनांना दक्षिण भारतात जावे लागले आणि आंध्र

प्रदेशात जाऊन ते स्थिर झाले.

शातकर्णीच्या नंतर झालेल्या सातवाहन राजांमध्ये ‘ हाल ’ नावाच्या राजाचे नाव विशेष प्रसिद्ध झाले. परंतु त्याची प्रसिद्धी ही त्याच्या पराक्रमाची किंवा राज्यवृद्धीची नव्हती. तो मोठा रसिक, साहित्यप्रेमी आणि स्वतः एक महान कवी म्हणून प्रसिद्ध होता. हाल हा प्राकृत भाषेतील मोठा कवी होता. ‘ गाथा सप्तशती ’ या ग्रंथाचा लेखक म्हणून तो फार प्रख्यात आहे. याची भाषा प्राकृत मराठी होती. बिहारी किंवा हिंदीमधील ‘ सतराई ’ आणि ‘ दोहा ’ साहित्याची प्रेरणा ‘ गाथा सप्त-शती ’ या हालाच्या या ग्रंथाने पुरविली आहे. गाथा सप्तशतीमध्ये सातशे सुंदर काव्यरचना आहे. बृहत्कथेचा लेखक गुणाढ्य आणि संस्कृत व्याकरणाचा कर्ता हे दोघे हालाच्या राज्यसमेत होते, अशी एक आख्यायिका आहे.

महाराष्ट्रामध्ये ज्या शकांनी आपली राजसत्ता स्थापन केली होती त्या वंशाचे नाव ‘ क्षहरात ’ असे होते. क्षहरात आणि सातवाहन यांच्यामध्ये राजकीय वर्चस्वावरून संघर्ष चालत असत. नहपान या नावाचा एक क्षहरात सरदार होता. याच्या काळातील नासिक येथील एका लेखामध्ये शक–सातवाहन संघर्षासंबंधी उल्लेख आहे. या संघर्षात कधी शक विजयी होत असत तर कधी सातवाहन. नहपानाची नाणी आणि लेख उपलब्ध झालेली आहेत. त्यावरून त्याचे राज्य दूरवर पसरलेले होते असे दिसते. त्याचे राज्य नासिक, पुणे यांसह माळवा, गुजराथ, काठेवाड आणि राजपुतान्यातील पुष्करपर्यंत भिडलेले होते. परंतु शकांचे हे राज्यही फार काळ टिकले नाही. सातवाहन वंशातीलच एक महान पराक्रमी राजा गौतमीपुत्र शातकर्णी याने त्यांचा पराभव केला आणि आपल्या वंशाची प्रतिष्ठा पुनः प्रस्थापित केली.

गौतमीपुत्र शातकर्णी हा सातवाहन वंशातील तेवीसावा राजा होय,

असे पुराणांनी म्हटलेले आहे. त्याने आपल्या पराक्रमाच्या बळावर सातवाहन वंशाची पुनः प्रतिष्ठापना केली. याला याची माता गौतमी हिच्या नावावरून 'गौतमीपुत्र' असे म्हणत असत. याचा पुत्र वासिष्ठीपुत्र पुलमायी याने नंतर खोदलेल्या नासिक येथील शिलालेखांवरून गौतमीपुत्र शातकर्णीच्या गुणांची कल्पना येते. या लेखात याने संपादन केलेल्या यशाविषयी आणि याच्या योग्यतेविषयी बरीच प्रशंसा केलेली आहे. त्याने आपल्या वंशाची पुनः स्थापना केली आणि तो पुनरपि वैभवशाली केला. या त्याच्या कार्याबरोबरच त्याने विदेशी आक्रमक शक यांना आपल्या मातृभूमीतून हुसकून लावले, ही त्याची महनीय कामगिरी मानली जाते. विरोध करणाऱ्या अनेक समकालीन राजांशीही त्याने युद्ध केले आणि त्यांचा पराभव केला. शक, यवन, पल्हव, क्षहरात या आक्रमकांचा बीमोड करून गौतमीपुत्राने आपल्या वंशाची मानप्रतिष्ठा वाढविली. याचे विवरण नासिक येथील लेखात आढळते. क्षहरात सरदार नहपान याचा पराभव गौतमीपुत्रानेच केला, हे संशोधकांना सापडलेल्या नाण्यांवरून आता सिद्ध झालेले आहे. नहपानाच्या चांदीच्या नाण्यावर गौतमीपुत्राची राजमुद्रा अंकित केलेली आहे. त्यावरून क्षहरात राजा नहपान याचा पराभव केल्यानंतरच त्याच्या नाण्यांवर आपली राजमुद्रा गौतमीपुत्राने उमटवून घेतली असावी, हे उघड होते.

गौतमीपुत्राच्या दिग्विजयाचे वर्णनही नासिकच्या लेखात आलेले आहे. त्यात म्हटले आहे की, गौतमीपुत्राने प्रचंड सैन्य घेऊन आपली विजययात्रा आरंभिली होती. त्याच्या वाहनांनी तीन समुद्रांचे जल प्राशन केले होते. त्याचे राज्य ऋषिक [ गोदावरी आणि कृष्णा यांच्यामधील प्रदेश ], अश्मक [ गोदावरीच्या काठावरील प्रदेश ], अपरान्त [ कोकणातील उत्तर भाग ], अनूप [ मध्यभारतातील निमाड प्रदेश ], विदर्भ, आकर [ पूर्व माळवा ], अवन्ती [ उज्जैन आणि पश्चिम माळवा ] या

विस्तृत प्रदेशांवर होते. सर्व राजांनी त्याचे स्वामित्व स्वीकारलेले होते. याच लेखांत अनेक पर्वतश्रेणींचा अधिपती 'असे' त्यास म्हटलेले आहे. त्यावरून विंध्यपर्वताच्या पलीकडेही त्याची सत्ता होती असे स्पष्ट होते. त्याच्या अधिकाराखाली विंध्य, ऋषवत, परियात्र, सैह्य, मलय, महेन्द्र आणि दक्षिण भारतातील प्रायतद्विपाला वेढणाऱ्या अनेक पर्वतरांगा होत्या.

गौतमीपुत्र हा केवळ एक महान विजेताच नव्हता तर एक गुणवान व्यक्ती म्हणून देखील प्रसिद्ध होता. नासिक येथील लेखांत त्याच्या अंगच्या गुणांचाही पुष्कळ उल्लेख केलेला आढळतो. त्याचे व्यक्तित्त्व देखणे होते. त्याचे मुखमंडल दीप्तिमय आणि प्रभावशाली होते. त्याचे चालणे रुबाबदार होते आणि त्याचे बाहू लांब आणि बलिष्ठ होते. त्याचा स्वभाव अत्यंत मृदु आणि करुणामय होता. सर्वांचे संरक्षण करण्यासाठी तो सदैव दक्ष राहात असे. तो आपल्या आईचा एक आज्ञाधारी पुत्र होता आणि विघातक शत्रूंचाही बंदोबस्त करताना त्याला दुःख होत असे. तो गुणीजनांचा आश्रयदाता होता. प्रजेच्या सौभाग्याचे आशास्थान होता. आणि श्रेष्ठ अशा व्यवहाराचे उगमस्थान होता. या गुणांच्या बरोबरच एक आदर्श शासक म्हणूनही अनेक गुण त्याच्याजवळ होते. आपल्या प्रजेचे सुखदुःख हे तो आपल्या सुखदुःखासमान समजत असे. तो आपल्या प्रजेवर आवश्यकतेहून अधिक कर लावत नसे, आणि अपराध्यांशीही त्याचे वागणे सरळ आणि दयापूर्ण असे. या लेखात गौतमीपुत्राचा गौरव आणखी एका कामासाठी केलेला आहे आणि तो म्हणजे, त्याने ब्राह्मण धर्माचे पुनरुत्थान केले. त्याने केवळ वैदिक परंपरांचा स्वीकार करून त्यांनाच प्राधान्य दिले असे नव्हे, तर ब्राह्मण धर्माला जी तत्त्वे घातक ठरली होती त्यांचे उन्मूलन करण्याचाही प्रयत्न केला. बौद्ध धर्माचा प्रभाव आणि विदेशी आक्रमकांशी संपर्क या कारणां-

मुळे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि क्षुद्र या चार वर्णांमध्ये जी परस्पर वर्णसंकरता उत्पन्न झालेली होती, ती गौतमीपुत्राने दूर करण्याचा प्रयत्न केला.

गौतमीपुत्र शातकर्णी याने इ. स. १०६ ते १३० पर्यंत म्हणजे २४ वर्षे राज्य केले होते.

गौतमीपुत्रानंतर त्याचा मुलगा वासिष्ठीपुत्र पुलमायी हा राजा झाला. पुराणात याला 'पुलोमा' असेही म्हटलेले आहे. याने सुमारे पंधरा वर्षे राज्य केले होते. पुलमायी हा देखील आपल्या पित्याप्रमाणेच शूर आणि पराक्रमी होता. त्याने आपल्या पूर्वजांप्रमाणेच विवाहसंबंध प्रस्थापित करून मैत्री करण्याचा आणि सेनेच्या बळावर विजय प्राप्त करून आपली राज्यस्थिती सुदृढ करण्याचा प्रयत्न केला होता. उज्जैनी येथील शक क्षत्रप रुद्रदामन याच्या कन्येशी पुलमायीने विवाह केला होता. या विवाहासंबंधाच्या द्वारा शक-क्षत्रप यांच्याशी पुलमायीला दीर्घकालीन मैत्री जरी प्रस्थापित करता आली नाही तरी, या संबंधांचा लाभ त्याला अवश्य झाला. रुद्रदामन राजाच्या जुनागढ येथील शिलालेखात असे स्पष्ट म्हटलेले आहे की, याने दक्षिणापथाच्या स्वामीचा युद्धात दोन वेळा पराभव केला. परंतु त्याला नष्ट न करता याने यश मिळविले, कारण की तो (पुलमायी) याचा निकटचा नातेवाईक होता. वासिष्ठिपुत्र पुळमायी याने सातवाहनांचे राजकीय प्रभुत्व आंध्र देशापर्यंत नेऊन भिडविले होते. त्याच्या काळात सातवाहन वंशाचा गौरव पूर्वीप्रमाणे टिकून राहिला नाही. याच्या राजवटीच्या वेळीच शक पुनः प्रबळ झाले आणि मध्यभारत आणि गुजरातमधील प्रदेश पुनः सातवाहनांच्या सत्तेखालून गेले. याने इ. स. १५४ पर्यंत राज्य केले.

यज्ञश्री शातकर्णी अथवा श्रीयज्ञ शातकर्णी हा सातवाहन वंशातील अखेरचा प्रतापी आणि शक्तीशाली राजा झाला. याने इ. स. १६२ ते

१९५ पर्यंत राज्य केले. यज्ञश्री शातकर्णीने गौतमीपुत्र शातकर्णीप्रमाणेच आपल्या वंशाचा गौरव प्रतिष्ठापित करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. ठाणे आणि नासिक या जिल्ह्यांमध्ये सापडलेल्या शिलालेखांवरून यज्ञश्री शातकर्णीने आपल्या राज्याच्या सीमा कशा विस्तारलेल्या होत्या याचे विवरण केलेले आढळते. त्याची नाणी गुजरात, काठेवाड, पूर्व माळवा, अपरान्त, मध्यप्रांत आणि आंध्रमधील कृष्णा जिल्ह्यात सापडलेली आहेत. यावरून त्याचे राज्य एवढ्या विस्तृत प्रदेशावर होते हे स्पष्ट होते आणि महाराष्ट्र व आंध्र हे दोन्ही प्रदेश त्याच्या सत्तेखाली होते हे देखील कळून येते. यानेदेखील शकांच्या नाण्यावरच आपली नाणी काढलेली आहेत. अशा तऱ्हेची त्याची चांदीची नाणी बऱ्याच प्रमाणात सापडलेली आहेत. यावरून शकांनी काही काळापूर्वी सातवाहनांकडून घेतलेला गुजरात आणि सौराष्ट्रातील प्रदेश पुनः यज्ञश्री शातकर्णीने जिंकून घेतलेला होता असे दिसते. महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेश हे दोन प्रदेश संपूर्ण ज्याच्या अधिकाराखाली होते असा यज्ञश्री शातकर्णी हाच एक सातवाहन वंशातील राजा होता, असे काही विद्वानांचे मत आहे. याच्या कारकीर्दीत व्यापार–उद्योगाचीही मोठी उन्नती झालेली होती. याच्या काही नाण्यांवर जहाजाची काही चित्रे रेखलेली आहेत. त्यावरून यज्ञश्रीच्या काळी सामुद्रिक व्यापारही मोठ्या प्रगत अवस्थेत असावा, असे अनुमान निघते.

यज्ञश्री शातकर्णीच्या पश्चात सातवाहनांचे राजकीय प्रभुत्व दिवसेदिवस क्षीण होत गेले. यांच्या पश्चात झालेले सर्व राजे निर्बल, क्रियाहीन आणि अयोग्य असे निघाले. काही पुराणांमध्ये विजय, चन्दश्री अथवा चन्द्राश्री या दोन राजांचा उल्लेख आढळतो. पण हे दोघेही नावापुरतेच राजे होते. त्यांच्या हाती राजसत्ता नव्हती. इ. स. २२५ पर्यंत अशा क्षीण अवस्थेतच सातवाहनांची राजवट कुठे कुठे चालू होती. परंतु त्यानंतर मात्र ती पूर्णतया लुप्त झाली.

सातवाहनांचे साम्राज्य अस्ताला गेले ते दुर्बल व अयोग्य राजे, कुटिरता, राज्य प्रतिनिधींची स्वतंत्र राज्य स्थापन करण्याची लालसा, राज्यकारभारातील शैथिल्य, इत्यादी कारणांमुळेच गेले. सातवाहनांच्या साम्राज्याला त्याच्या प्रारंभकाळापासूनच परकीय प्रबल अशा शकांच्या शक्तीशी सामना द्यावा लागला होता. या संघर्षात त्यांना कधी विजय तर कधी पराजय पत्करावा लागला. धन आणि सैन्य यांची हानीही झाली. उत्तरकालीन साम्राज्यातील सरदार आणि अधिकारी यांनी राजहिताकडे दुर्लक्ष केले. देशहित गौण मानले आणि आपापल्या वैयक्तिक स्वार्थ साधण्याच्या ते मागे लागले. सातवाहनांच्यानंतर दक्षिणेत नव्या राजकीय शक्तींचा विजय झाला. महाराष्ट्रामध्ये आभिर आणि पूर्व दक्षिणेमध्ये इक्ष्वाकू आणि पल्लव या राजवटी निर्माण झाल्या.

सातवाहनांच्या काळात परकीय आक्रमणाला जरी तोंड द्यावे लागले असले तरी साहित्य, संस्कृती, कला, धर्म इत्यादी क्षेत्रात काहीशी उन्नतीच झालेली दिसून येते. सातवाहनांनी खोदलेले शिलालेख, गाथा सप्तशती आणि इतर साहित्य यावरून याची साक्ष मिळते.

सातवाहन-काळातील सामाजिक जीवनाकडे नजर टाकली असता असे लक्षात येते की, तत्कालीन दक्षिण भारतामधील समाजात स्त्रियांना गौरवाचे स्थान होते. आवश्यकतेनुसार त्या राज्यकारभाराची सूत्रेही हाती घेऊ शकत होत्या. पहिल्या शातकर्णीच्या मृत्यूनंतर पुत्र अल्पवयीन असल्यामुळे त्याच्या पत्नीनेच राज्यसूत्रे हाती घेतली होती. गौतमीपुत्र, वसिष्ठिपुत्र, माढरीपुत्र इत्यादी मातृपर नावे स्त्रियांना समाजामध्ये आदराचे स्थान होते हेच सिद्ध करतात. स्त्रिया आपल्या पतीबरोबर धार्मिक कार्यात भाग घेत असत. राजाबरोबर राणीनेही अश्वमेध यज्ञामध्ये भाग घेतलेला होता असा उल्लेख तत्कालीन शिलालेखात आढळतो. स्त्रीला माता म्हणून अधिक सन्मान मिळत असे. तिच्यावर वैधव्य कोसळले तरी तिचा छळ

होत नसे. गौतमी बलश्री ही विधवा होती; ती आपले जीवन सत्य, दान, धैर्य आणि करुणा इत्यादी गुणांनी मिळणाऱ्या आनंदाने व्यतीत करीत होती, असा उल्लेख तत्कालीन लेखांमध्ये आहे.

सातवाहन राजे ब्राह्मण होते आणि त्यांनी ब्राह्मण धर्माचे पुनरुत्थान केले. वर्णाश्रम धर्माचा प्रचार केला आणि वर्णसंकर दूर करण्याचा प्रयत्न केला. गौतमीपुत्र हा ब्राह्मण धर्माचा कट्टर अनुयायी होता. त्याने विदेशी लोकांना आपल्या जातीत सामावून घेणे अनुचित मानले. परंतु क्षत्रिया-मध्ये अनेक विदेशी सामावून गेले होते. काही सातवाहन राजांनीही परकीय स्त्रियांशी विवाह केलेले होते. यावरून आंतरजातीय विवाह प्रचलित होते असे अनुमान निघते.

हालाच्या 'गाथासप्तशती' या ग्रंथावरून तत्कालीन सामाजिक परि-स्थितीची कल्पना येते. यातील श्रेष्ठ दर्जाच्या काव्यामधून मानवाच्या इहलोकातील जीवनालाच प्राधान्य दिलेले आहे. यज्ञयाग, मोक्ष, इत्यादींची चर्चा यात नाही. समाजातील खालच्या स्तरातील लोकांचे जीवनही सुखी होते, त्यांना कष्ट सहन करावे लागत नव्हते असे दिसते. या ग्रंथात शृंगाररसाचा आविष्कार सर्वत्र झालेला आहे त्यावरून जीवनाकडे पहा-ण्याचा त्यांचा शांत आणि आशावादी दृष्टीकोन लक्षात येतो.

सातवाहन युगातील दक्षिण भारतामधील धार्मिक वातावरण उदार आणि सहिष्णू होते. बहुतेक सर्व सातवाहन राजे स्वतः जरी ब्राह्मण-धर्मी होते तरी त्यांनी अन्य धर्माच्या लोकांवर कसल्याही प्रकारचा अत्याचार केलेला नाही. त्यांच्या राजवटीत बौद्ध धर्माचा प्रचार मुक्त-पणाने चालत होता आणि कलेच्या क्षेत्रात बौद्धांनी या काळी अनेक चैत्य, गुहा इत्यादी निर्माण करून मोठी भर घातलेली आहे.

सातवाहनांच्या काळात विदेशी आक्रमकांनी फार मोठ्या प्रमाणावर हिंदू धर्माचा स्वीकार केला. शक, पल्हव यांनी हिंदूंची सामाजिक रचना

आत्मसात केली होती. शुंग कालात एका यवन राजदूताने भागवत धर्माचा स्वीकार केला होता, तीच परंपरा याकाळीही पुढे चालू राहिली होती. या परदेशी लोकांनी येथील धर्म स्वीकारल्यानंतर त्यानुसार आपली नावेही बदलली होती. मिनॅण्डर या ग्रीक सेनापतीने बौद्ध धर्म स्वीकारल्यानंतर 'मिलिंद' असे नाव घेतलेले होते. एका बौद्ध भिक्षूशी त्याची झालेली चर्चा 'मिलिंदपन्हो'-'मिलिंदप्रश्न' या नावाने प्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणे 'सिहधीय' चा 'सिंहध्वज' बनला. 'चीट' चा 'चंद्र' झाला.

सातवाहन युगात दक्षिण भारत आर्थिकदृष्ट्या संपन्न आणि समृद्ध होता. लोकांचे आर्थिक जीवन कृषी, उद्योगधंदे आणि व्यापार या तिन्ही दृष्टीने भरभराटीत होते. या काळी प्रचलित असलेल्या श्रेणी नामावरून आर्थिक जीवनाची कल्पना येते. 'धंजीक' म्हणजे अन्नविक्रेता, 'कुम्हार' म्हणजे कुंभार, 'कोलिक-निकाय' म्हणजे कोष्टी, 'तिलपिशक' म्हणजे तेली, 'कांसकार' म्हणजे काशाची भांडी बनवणारा, 'वंसकार' म्हणजे बांबूच्या वस्तू बनवणारा.

या काळच्या अनेक तऱ्हेच्या सापडलेल्या नाण्यांवरून तत्कालीन आर्थिक समृद्धी सूचित होते. सर्वात भारी किंमतीच्या नाण्याला 'सुवर्ण' म्हटले जाई. त्याच्या खालोखाल 'कुषण' नावाचे चांदीचे नाणे होते. 'कार्षापण' नावाची चांदीची आणि तांब्याची लहान लहान नाणी होती. दैनंदिन व्यवहारात याचा उपयोग लोक करीत असत. व्याजाने पैसे देण्या-घेण्याची प्रथा रूढ होती.

राज्यांतर्गत दळणवळणाच्या सोयीसाठी सडका बांधलेल्या होत्या, त्यावरून देशाच्या विविध भागांत व्यापार चालत असे. दक्षिण भारतात पैठण, नगर, नासिक, जुन्नर, कऱ्हाड इत्यादी व्यापाराची मोठी केंद्रे होती. ही केंद्रे राजमार्गाने एकमेकांशी जोडलेली होती. भडोच, सोपारा

आणि कल्याण या तत्कालीन प्रसिद्ध बंदरांमधून परदेशाशी व्यापार चालत असे.

सातवाहनांच्या राजवटीत राज्यकारभारासाठी ‘ मंत्री परिषद ’ होती. मंत्र्यांना मोठा सन्मान आणि अधिकार असे. जुनागढ येथील रुद्रदामनाच्या शिलालेखात मंत्री परिषदेविषयीची चर्चा विस्ताराने आलेली आहे. ठिकठिकाणी ‘महासेनापती’ नेमलेले होते. हे जिल्हाधिकारीच होते. नगरशासनाच्या व्यवस्थेमध्ये ‘ नगरसभा ’ होत्या आणि ‘ नगराक्षदक्ष ’ नावाचे अधिकारी होते. ग्रामीण भागातही ग्रामवासियांना स्वायत्तता होती. गावामधून ग्रामसभा होत्या. कला आणि साहित्य यांचा विकास या काळी झाला. गुहा, मंदिरे आणि शैलगृहे यांच्या स्वरूपात वास्तुकलेची उन्नती झालेली दिसते. दक्षिणेमधील जवळजवळ सर्वच शैलगृहांची आणि गुहामंदिरांची निर्मिती सातवाहन युगात झालेली आहे. नासिक, कार्ले आणि भाजा येथील गुहा–विहार आणि गुहा–चैत्य या अत्यंत सुंदर शिल्पभवनांची उन्नती सातवाहन युगातच झालेली आहे. सातवाहन राजे प्राकृत भाषेचे पुरस्कर्ते आणि प्राकृत कवींचे आश्रयदाते होते. त्यांचे सर्व शिलालेख प्राकृत भाषेत खोदलेले आहेत. त्यांच्या काळात प्राकृत भाषा आणि साहित्य यांची फार मोठी उन्नती झाली. परंतु या काळातील प्राकृत भाषेवरही संस्कृतचा प्रभाव दिसून येतोच.

22609 224



# खारवेल

भारतीय इतिहासात ‘कलिंग’ प्रदेशाला खूपच प्रसिद्धी लाभलेली आहे. महाभारतामध्ये कलिंग, ओड्र आणि उत्कल या तिन्ही नावांचा उल्लेख अनेकवार आलेला आहे. गय आणि उत्कल हे दोघे भाऊ भाऊ होते. सुद्युम्न अथवा इल नावाच्या राजाची ही दोन मुले होती. गय आणि उत्कल या दोन राजांपासून ओड्र आणि उत्कल ही नावे प्रचारात आली. गय नावाच्या राजाला पूर्वेकडील देशाचे राज्य मिळाले होते. तिकडे त्याने गया नगरी या नावाची ,आपली राजधानी वसविली होती. गया व उत्कल या प्रदेशाला पूर्वी धमाढ्य असे नाव होते. उत्कल राजाचे राज्य कपिशा नदी आणि मेकल लोकांचे राज्य याच्या मधल्या प्रदेशावर होते. या प्रदेशाला या राजाच्या नावावरून ‘उत्कल’ असे म्हणू लागले. याचेच पुढे आजचे ओडिसा किंवा ओरिसा बनले. ओडिसा प्रांतात पूर्वी कलिंगचा समावेश होता. कलिंग हे प्राचीन भारतातील पूर्वेकडील एक

राज्य होते. ऐतरेय ब्राह्मणात कलिंग शब्द आढळतो. कक्षीवान ऋषीचा उल्लेख मात्र ऋग्वेदात आढळतो. हा कक्षीवान कलिंग देशाच्या राणीच्या दासीचा पुत्र होता. महाभारतात या देशाचे स्थान आर्यावर्ताच्या पूर्वेस असून 'राजपुरी' द्रौपदी–स्वयंवराच्या वेळी दुर्योधनाच्या बरोबर कलिंग राजाही होता. अर्जुनाने जी तीर्थयात्रा केली होती, त्यात अंग आणि वंग या देशाबरोबरच कलिंग देशातही तो गेला होता. भारतीय युद्धात कलिंग राजा आपल्या गजदलासह कौरवांच्या बाजूने लढला होता. कालांतराने युधिष्ठिराने कलिंग देशात एक यज्ञदेखील केला होता, असे उल्लेख प्राचीन ग्रंथांतून आढळतात.

प्राचीन इतिहासात 'त्रि–कलिंग' असा शब्द आढळतो. विद्वानांच्या मते उत्कल, कंगोद आणि कलिंग या तीन देशांना मिळून पूर्वी त्रि–कलिंग म्हणत असावेत. कलिंगाचा उल्लेख नेहमी अंग–वंग यांच्याबरोबर होतो. सुषेना नावाच्या बलिराजाच्या राणीला दीर्घतमा ऋषीपासून जे पाच पुत्र झाले, त्यांतल्या एकाचे नाव कलिंग होते. यानेच पुढे आपल्या नावाने राज्य स्थापले.

बौद्ध जातकांमध्ये कलिंगाची राजधानी दंतपूर येथे होती असे म्हटले आहे. बुद्धाच्या निर्वाणानंतर त्याच्या अवशेषांची वाटणी झाली त्यावेळी येथील ब्रह्मदत्त राजाच्या वाटणीस बुद्धाच्या डाव्या बाजूचा एक दात आला अशी बौद्ध कथा आहे. दंतपूरच्या राजाने राज्यात एकदा दुष्काळ पडला असताना त्याच्या निवारणार्थ 'अंजनवासव' नावाचा हत्ती आणण्यासाठी कुरु राजाकडे काही ब्राह्मणांना धाडले होते. 'कलिंगबोधी' नावाच्या जातकामध्ये असे म्हटले आहे की, दंतपूरच्या कलिंग राजाला दोन पुत्र होते आणि त्यांची नावे 'महा-कलिंग' आणि 'चुल्लकलिंग' अशी होती.

चंद्रगुप्ताच्या दरबारात मेगॅस्थनिस नावाचा जो ग्रीक राजदूत होता, त्याने आपल्या ' इंडिका ' नावाच्या ग्रंथात सीमांसंबंधी लिहिले आहे की, कलिंगाच्या उत्तरेस गंगा नदी, दक्षिणेस गोदावरी, पश्चिमेला पर्वतांच्या रांगा आणि पूर्वेला समुद्र होता.

अशोकाच्या मृत्यूनंतर थोड्याच काळात कलिंग परत स्वतंत्र झाला. मौर्य साम्राज्याच्या ढासळत्या काळात ज्यावेळी दक्षिण भारतात सातवाहन वंशाचा उदय झाला, त्याच सुमारास कलिंगमध्ये एक नवा राजवंश उदयाला आला. हा राजवंश चैद्य क्षत्रियांचा होता. त्याचे मूलस्थान चेदी जनपद अर्थात बुंदेलखंड हे होते. तिथून कलिंगपर्यंत मजल मारून या राजवंशाने तिथे आपले राज्य स्थापले. या राजवंशातला तिसरा पुरुष ' खारवेल ' हा होय. त्या काळातला तो कलिंगचक्रवर्ती समजला जातो. उदयगिरी येथील हाथीगुंफेतल्या शिलालेखावरून खारवेल हा कलिंग राजा जैन असल्याचे कळते. त्याच्या कारकिर्दीत कलिंगमध्ये जैन धर्माचा उत्कर्ष झाला होता. उदयगिरीवर जैन-अर्हतांची मंदिरे होती.

वयाच्या पंधराव्या वर्षी खारवेल यास युवराजपद मिळाले. चोविसाव्या वर्षी त्याला महाराज्याभिषेक झाला. त्यानंतर दुसऱ्याच वर्षी त्याने सातकर्णींची पर्वा न करता पश्चिम दिशेला आपले सैन्य पाठविले आणि मूषिक राज्य जिंकले. चार वर्षांनंतर फिरून पश्चिमेवरच चढाई करून त्याने भोजकांना शरण आणले. महाराज्याभिषेकानंतर सहाव्या वर्षी त्याने राजसूय यज्ञ केला होता.

दिमित्र अथवा डेमेट्रिअस हा ग्रीक राजा प्रचंड सैन्य घेऊन मध्य देशांवर आक्रमण करून आला असताना खारवेल राजाने त्याच्याशी युद्ध करून त्याचा पराभव केला होता. या विजयाने खारवेल राजाला तत्कालीन राजमंडळात श्रेष्ठत्व प्राप्त झाले होते. याने महाराष्ट्र व मगध आणि उत्तर व दक्षिण या दिशांना अनेक दिग्विजय केले होते, असे

उल्लेख प्राचीन साहित्यात आढळतात. मगधाच्या स्वारीत तेथील शुंग राजाला याने पराजित केले आणि पूर्वी नंद राजाने कलिंगावर विजय मिळवून तिथली जिनमूर्ती विजयचिन्ह म्हणून जी मगधात नेली होती, ती खारवेलाने पुनश्च हस्तगत केली आणि तिची कलिंगात पुन: प्रतिष्ठापना केली. खारवेल राजाने शुंग, दक्षिणापथाचे सातवाहन व उत्तरापथाचे ग्रीक-यवन यांना आपल्या प्रभावाने नमविल्यानंतर जैन धर्माचे महानुष्ठान केले होते. खारवेलाने अखिल भारतातल्या यति-मुनींना आणि पंडितांना बोलावून एक धर्मसम्मेलनही बोलाविले होते. त्या प्रसंगी जैन संघाने खारवेल राजाला खेमराजा, भिखुराजा व धर्मराजा अशा पदव्या दिल्या होत्या.

खारवेल राजाने राज्य व धर्मप्रसार याबरोबरच प्रजेच्या हिताकडेही लक्ष दिले होते. आपल्या राज्यातील जुन्यापुराण्या वास्तूंचा जीर्णोद्धार तर त्याने केलाच, पण काही नवीन वास्तूही बांधल्या. त्याचप्रमाणे ठिक-ठिकाणी स्वच्छ व थंड पाण्याची तळीही बांधून काढली. किल्ल्यांची डागडुजी केली. ३५ लाख सुवर्णमुद्रा खर्चून प्रजेच्या मनोरंजनाची आणि आमोद-प्रमोदाची व्यवस्था केली.

हाथीगुंफा येथील शिलालेखावरून खारवेल राजा हा एक विजेता आणि प्रभावशाली सम्राट होता हे स्पष्ट होते. याने मिळविलेल्या अनेक विजयांचा उल्लेख या लेखात आहे.

खारवेल राजाने दोन वेळा उत्तर भारतावर आक्रमण केलेले होते. त्यांत दिमित्र नावाचा एक ग्रीक राजा राजगृह सोडून मथुरेला पळून आला असे म्हटले जाते. हा दिमित्र म्हणजे पंजाबमधील एखादा तत्कालीन छोटा ग्रीक राजा असावा असे विद्वानांचे म्हणणे आहे. खारवेलने प्राची नदीच्या तीरावर आपल्या विजयाप्रीत्यर्थ ‘महाविजय प्रासाद’ उभविलेला होता. उत्तर भारतात मिळविलेल्या विजयाचे हे

स्मारकच होते. ‘आपल्या हत्ती–घोड्यांना खारवेल राजाने गंगेचे स्नान घडविले’ असे हाथीगुंफेतील शिलालेखात म्हटलेले आहे. खारवेल राजाने भुवनेश्वर येथेही एक प्रचंड मंदिर बांधले असा एक उल्लेख ब्रह्माण्ड पुराणात आढळतो. याच पुराणात खारवेलने नेपाळवर आक्रमण केले होते असे म्हटले आहे.

खारवेल राजाच्या शासनकालाविषयी विद्वानांमध्ये मतभेद आहेत, परंतु उपलब्ध असलेल्या पुराव्यांनुसार इसवी सनापूर्वी पहिल्या शतकात हा राजा होवून गेला असावा असे मानले जाते.

□



## शक

प्राचीन भारतीय साहित्यामध्ये ज्या परस्थ जातींच्या आक्रमकांचा उल्लेख आढळतो त्यांत ‘शक’ लोकांचा अगदी प्रारंभी संबंध आलेला दिसतो. शकांनंतर यवन आणि पल्हव जमाती आलेल्या दिसतात. संस्कृत साहित्यात अनेक ठिकाणी ‘शक, यवन, पल्हव’ असे शब्द वापरलेले आढळतात. यावरूनही भारतात आलेल्या परस्थ जमातींचा बोध होतो. भारतामध्ये त्या काळात जेवढ्या म्हणून परदेशी लोकांच्या टोळ्या आल्या आणि इथेच वसल्या त्या सर्वांना पुढच्या काळात ‘व्रात्य’ क्षत्रिय असे म्हटले जाऊ लागले. त्याचे आणखी एक कारण असे होते की, या जमातीतील अनेक लोकांनी स्वतःला हिंदू धर्मात सामावून घेण्याचा प्रयत्न केला होता आणि ते प्रामुख्याने क्षत्रिय वर्णात मिसळले होते. या सर्व विदेशी जमातींना त्या काळी ‘म्लेंच्छ’ या नावाने संबोधिले जात असे. सर्वांत प्रथम या देशात ग्रीक आले. त्यांची वायव्येकडील सत्ता

ज्यांनी नष्ट केली ते होते शक, पल्हव अथवा पार्थियन आणि यूची अथवा कुषाण. शकांचा उल्लेख 'सीथियन' या शब्दानेही केला जातो. हे लोक मूलतः मध्य-आशियातील भटक्या जमातींपैकी होते. आसपास-च्या टोळ्यांच्या आक्रमणाला घाबरून आणि आपल्या स्वाभाविक अशा भटक्या वृत्तीला अनुसरून शकांनी विविध ठिकाणी जाऊन वस्ती केली होती. शक लोक कन्दहार–बलुचिस्थान या मार्गाने भारतामध्ये आले आणि सिंधू नदीच्या काठी सिंध प्रदेशात राहिले. भारतीय ग्रंथकारांनी या त्यांच्या नवीन वसतीस्थानाला 'शकद्वीप' असे म्हटले आहे, तर ग्रीक भूगोलवेत्त्यांनी 'इण्डोसीथिया' असे म्हटले आहे. हे स्थान शकांना सुरक्षित आणि सोयीचे वाटले, म्हणून ते येथेच राहिले आणि येथे राहूनच त्यांनी भारताच्या विविध भागांत जाऊन आपली राज्ये स्थापन केली. शकांचे पुढीलप्रमाणे पाच राजवंश उदयाला आले होते. (१) सिंध आणि पश्चिम पंजाबमधील शक-कुल, ( २ ) वायव्येचे क्षत्रप, ( ३ ) मथुरेचे क्षत्रप, ( ४ ) महाराष्ट्रातील क्षहरात, ( ५ ) उज्जैनचे क्षत्रप.

भारतामध्ये सापडलेल्या शिलालेखांत प्राचीनतेच्या दृष्टीने ज्या शक राजाचा उल्लेख सर्वप्रथम मिळतो त्या राजाचे नाव आहे माऊस. याला 'मोग' असेही म्हटलेले आहे. याचा उल्लेख तक्षशिला येथील ताम्रपटा-मध्ये आढळतो. माऊस हा एक पराक्रमी योद्धा आणि प्रबल विजेता होता. त्याने गांधार आणि तक्षशिला हे प्रदेश यवनांच्याकडून हस्तगत केलेले होते. याच्या क्षत्रपांनी म्हणजे सरदारांनी मथुरेच्या आसपास राज्य करीत असलेल्या इण्डोग्रीक राजांना पराजित केलेले होते. ग्रीकांच्या नाण्याप्रमाणेच माऊसने आपली नाणी पाडली होती. याचा शासनकाल इ. स. पूर्व ७२ मानला जातो. याच्या नाण्यांवर ग्रीक देवतेच्याबरोबरच बुद्ध आणि शिव यांच्या प्रतिमा आढळतात.

माऊसनंतर एजेस नावाचा शक राजा झाला. यानेही हिपास्ट्रेटस

याचे राज्य जिंकून घेतले आणि पूर्व पंजाबातील उरलेसुरले ग्रीकांचे राज्यही नष्ट केले. यानेही ग्रीकांच्या नाण्यावर आपली मुद्रा पुन्हा अंकित केली होती. याने आपल्या पित्याने मिळविलेले राज्य तर राखलेच, शिवाय ते वर्धिष्णूही केले. यमुनेच्या खोऱ्यातही याने राज्यस्थापना केली होती. आणि तेथे विक्रम-संवत चालू केला होता, असे म्हटले जाते. परंतु याला काही भक्कम आधार मिळत नाही. पहिल्या एजेसनंतर एजिलिसेस हा राजा झाला. काही नाण्यांवर ग्रीक भाषेत एका बाजूला एजेसचे आणि दुसऱ्या बाजूला प्राकृत भाषेत एजिलिसेसचे नांव आढळते. यावरून या दोघांनी मिळून संयुक्त शासन चालविले होते असे दिसते. एजिलिसेस नंतर पंजाब आणि सिंधमधील शक-राजवंशाचा अधिकार दुसऱ्या एजेसकडे गेला. या राजानंतर या प्रदेशातील शकांची राजसत्ता नष्ट झाली आणि तिच्या जागी पल्हव राजा 'गोण्डोफर्नीज' याची राजवट सुरू झाली.

शक क्षत्रपांच्या राजवंशाचा इतिहासही भारतात घडला. 'क्षत्रप' ही एक उपाधी होती. ही उपाधी किंवा पदवी फारशी वेहिस्तून शिलालेखात आढळते. क्षत्रपवान म्हणजे राज्याचे रक्षण करणारा असा अर्थ आहे. क्षत्रप हे स्वतंत्र राजे नव्हते, तर शक-सम्राटाचे प्रतिनिधी म्हणून निर-निराळ्या प्रदेशातील शासनाची व्यवस्था पहात होते. सिंधमध्ये आपली राजसत्ता स्थापन केल्यानंतर माऊसने क्षत्रप-व्यवस्थेचा प्रयोग केला होता. पश्चिम पंजाबमध्ये त्याने पतिक नावाचा आपला राज्यप्रतिनिधी (क्षत्रप) नियुक्त केला होता. क्षत्रप व्यवस्थेमध्ये प्रत्येक प्रांतात दोन क्षत्रप असत. एक महाक्षत्रप आणि दुसरा क्षत्रप; हा बहुधा महाक्षत्रपाचा पुत्र किंवा नातू असे. राजा आणि युवराज अशाच प्रकारचे या दोघांतील संबंध असत.

उत्तर भारतात पुढील क्षत्रप-वंश विशेष उल्लेखनीय होते.

काशिश वंशाचा उल्लेख मानिकिपाला येथील शिलालेखात असून गणव्यहक नावाच्या क्षत्रपाचा मुलगा येथील राज्यप्रतिनिधी होता. काबूल संग्रहालयातील एका शिलालेखावरून पुष्पपूर येथील शिवेहर्ण नावाच्या क्षत्रपाचा उल्लेख मिळतो. अभिसार येथील क्षत्रपाचे नाव शिवसेन होते, ते नाव पंजाब येथे सापडलेल्या एक तांब्याच्या शिक्क्यावर आढळलेले आहे. या तीन क्षत्रपांच्या अंमलाखाली योन, गांधार आणि काम्बोज हे प्रदेश असावेत. यांचा उल्लेख अशोकाच्या शिलालेखातही आढळतो.

नाणी आणि शिलालेख यांच्या सहाय्याने मथुरेतील क्षत्रपांचा इतिहास बराचसा समजून येतो. येथील शक-क्षत्रपांनी मथुरेचे राज्य शुंग वंशातील अखेरच्या राजाकडून किंवा एकाद्या काण्व राजाकडून हस्तगत केले असावे. या क्षत्रप कुळातील सुरुवातीचे राजे होते हगान आणि हगामस. काही काळ या दोघांनी मिळून राज्य केले होते. हे दोवे पितापुत्र होते की भाऊभाऊ होते, हे सांगणे कठीण आहे. परंतु काही नाण्यांवरून हे स्पष्ट होते की, हगामसने एकट्याने राज्य केले होते आणि काही नाण्यांवरून त्याने व हगाम या दोघांनी मिळून राज्य केले होते. त्यांच्यानंतर राजूल राजा झाला. मोरा येथील शिलालेखात याला महाक्षत्रप म्हटले आहे. त्याच्या नाण्यांवरही त्याला महाक्षत्रप असे विशेषण लावलेले आहे. यावरून असेही अनुमान निघते की, प्रारंभी हा क्षत्रप असावा आणि नंतर महाक्षत्रप बनला असावा. याचा पुत्र शोडास अथवा सुदास हा क्षत्रप म्हणून राज्यकारभारात याला मदत करीत होता आणि याच्यानंतर तोच महाक्षत्रप बनला. राजूल अथवा रज्जुवुल हा पराक्रमी राजा होता. याने पूर्व पंजाबातील ग्रीकांची राजवट नष्ट केली होती. याच्यानंतर शोडास हा राजा झाला. त्याच्यानंतरचा इतिहास मात्र फारसा उपलब्ध नाही. हा इ. स. १५ च्या सुमारास होऊन गेला असावा. याच्यानंतर मथुरेतील शक क्षत्रप कुळातील शक्ती क्षीण होत गेली. कुशाण आक्रमकांनी

कालांतराने हे राज्य नष्ट केले. हे शक येथील समाजजीवनात पूर्णपणाने मिसळून गेलेले होते. त्यातील काहीजणांनी जैन, तर काहींनी बौद्ध धर्म स्वीकारलेला होता.

पश्चिमेकडील क्षत्रप-कुळांचा इतिहास हा सर्व शक-राजकुलांमध्ये महत्त्वाचा आहे. पश्चिमेकडील क्षत्रप कुळांच्या दोन शाखा होत्या. एक महाराष्ट्रातील शहरात-कुलीन क्षत्रपांची आणि दुसरी उज्जैन येथील शक क्षत्रपांची. महाराष्ट्रातील शहरात छहर येथील रहिवासी असावेत. क्षहरात भूमक हा महाराष्ट्रातील क्षत्रप कुलाचा आद्य पुरुष होता. याची नाणी गुजरात आणि काठेवाड जवळच्या समुद्र किनाऱ्यालगतच्या प्रदेशांमध्ये सापडलेली आहेत. आणि याच्या काही मुद्रा राजपुताना, माळवा आणि अजमेर प्रदेशांतही सापडलेल्या आहेत. भूमकाच्या मुद्रालेखांमध्ये खरोष्ट्री आणि ब्राह्मी लिपीचा उपयोग केलेला आहे. त्यावरून वरील प्रदेशांशिवाय सिंधचा काही भागही याच्या सत्तेखाली होता असे दिसते. भूमकाने ज्या राजकुलाची प्रस्थापन केली, त्याच्याविषयी विस्तृत माहिती उपलब्ध नाही. त्याच्यानंतर नहपान हा शहरात कुलातील अधिकारी झाला.

नहपान हा महाराष्ट्रातील शहरात कुलामधील सर्वांत प्रसिद्ध असा शासक होऊन गेला. त्याच्याविषयीची माहिती तत्कालीन उपलब्ध झालेल्या नाण्यांवरून आणि शिलालेखांवरून बरीच मिळते. या लेखांमध्ये त्याला ‘राजन्’ या उपाधीने विभूषित केलेले आहे. त्यावरून भूमकापेक्षा त्याचा राजकीय दर्जा अधिक उच्च असावा. कदाचित त्याने एक स्वतंत्र शासक म्हणूनही राज्य केले असावे. तथापि त्याने कधीही कुषाण-सत्तेला उघडपणाने विरोध केलेला नव्हता. नहपानाची नाणी अजमेर जिल्ह्यात आणि नासिक येथे उपलब्ध झालेली आहेत. त्याच्या साम्राज्य विस्ताराची कल्पना शिलालेखांवरून येते. महाराष्ट्रामध्ये सातवाहनांचे जे शिलालेख सापडलेले आहेत, त्यांवरून महाराष्ट्रावर त्याची

सत्ता होती हे स्पष्ट होते. त्याचप्रमाणे नहपानाची नाणी आणि शिलालेख यावरूनही हे स्पष्ट होते की, याने सुरुवातीच्या सातवाहन राजांकडून महाराष्ट्र जिंकून घेतला होता आणि तेथे आपली सत्ता स्थापन केलेली होती. महाराष्ट्रात शक-राज्याचा विस्तार नहपानानेच केला.

नहपानाची राजवट दुसऱ्या शताब्दीच्या सुरुवातीच्या काळातच अस्तित्वात होती. त्याच्या राजवटीचा शेवट गौतमीपुत्र शातकर्णी याने केला. शातकर्णीने नहपानाचाच केवळ पराजय केला असे नव्हे, तर शकांना महाराष्ट्रातून हुसकावून लावले.

उज्जैन येथील शक-क्षत्रप राजवंशदेखील महत्त्वपूर्ण होता. या क्षत्रपांनी बराच काळपर्यंत राज्य केले. आणि भारताच्या राजकीय उलाढालीत, तसेच सामाजिक नवनिर्मितीच्या कामात बराच महत्त्वाचा भाग घेतला होता. या वंशातील प्रसिद्ध शासक रुद्रदामन याच्या कारकीर्दीवरून असे स्पष्ट दिसून येते की, आक्रमणकारी शक या कालापर्यंत या देशातील लोकजीवनाशी पूर्णपणाने मिळून-मिसळून गेलेले होते आणि भारताची प्राचीन संस्कृती आणि परंपरा आत्मसात करून त्यांचे पोषकही बनलेले होते. भारताच्या इतिहासात या क्षत्रप वंशाला महत्त्वपूर्ण असे स्थान आहे.

उज्जैन येथील क्षत्रप राजवंशाचा संस्थापक यसोमतिक नावाचा होता. हे नाव सीथियन आहे. चष्टन हा याचा मुलगा. हाच उज्जैनचा प्रथम शासक होता. याने कुषाणांचा एक सरदार या नात्याने सिंधवरही शासन केले होते. नहपानाच्या मृत्यूनंतर दक्षिण आणि पश्चिम भागातील उपशासक म्हणून कुषाणांनी चष्टनचीच नियुक्ती केली होती आणि सातवाहनांनीदेखील त्याला आपल्या शासनांतर्गत या भागावर त्याला पुनः कारभार पहाण्याचा आदेश दिला होता, असे काही विद्वानांचे मत आहे.

चष्टनने महाक्षत्रप बनल्यानंतर वृद्धापकाळी आपला पुत्र जयदामन याला क्षत्रप म्हणून नियुक्त केले होते. परंतु जयदामन हा अल्पायुषी ठरल्यामुळे त्याचा पुत्र पहिला रुद्रदामन हा क्षत्रप बनला. इ. स. १३०–३१ मध्ये रुद्रदामन हा महाक्षत्रप झाला. त्याची सर्व नाणी याचकाळातील आहेत. जुनागढ येथील शिलालेखावरून याच्या राजवटीसंबंधीची बरीच माहिती मिळते. या लेखाची तिथी शक संवत ७२ म्हणजेच इ. स. १५०–५१ आहे. गिरनार पर्वतावर जुनागढचा हा लेख उपलब्ध आहे. रुद्रदामनच्या पराक्रमाची आणि गुणांची प्रशंसा यात केलेली आहे. रुद्रदामन हा एक महान योद्धा आणि विजेता होता. महाक्षत्रप ही उपाधी याने वारसा हक्काने न मिळवता स्वपराक्रमाने प्राप्त करून घेतली होती. शातकर्णी राजाला याने दोन वेळा युद्धात पराजीत केले होते, परंतु आपला निकटसंबंधी असल्यामुळे त्याला याने मुक्त करून यश मिळविले होते. रुद्रदामनने युद्धामध्ये यौद्धेयांचाही मोठा पराभव केलेला होता. दक्षिण पंजाब आणि त्याचा आसपासचा प्रदेश यावर यौद्धेयांचे एक प्रबल गणतंत्र नांदत होते. आणि आपल्या स्वातंत्र्यप्रिय बाण्याने ते सदैव राज्यकर्त्यांना तंग करून सोडीत होते. रुद्रदामनने त्यांना जिंकून आपल्या साम्राज्यविस्तारामधील एक अडथळा दूर केला होता. त्याने आपल्या बाहुबलाच्या जोरावर एक विशाल भूभाग आपल्या सत्तेखाली आणला होता. शिलालेखावरून त्याच्या राज्यविस्ताराची कल्पना येते. याच्या सत्तेखाली आकर, अवंती, अनूप, आनर्त, सुराष्ट्र, श्वभ्र, मरु, कच्छ, सिंधू, सौवीर, कुकूर, अपरान्त आणि निषाद इत्यादी प्रदेश आलेले होते. नाशिक आणि पुणे या जिल्ह्यातील काही प्रदेशांवर मात्र रुद्रदामनाचा अधिकार नव्हता, गौतमीपुत्र शातकर्णीचा होता. परंतु गौतमीपुत्रानंतरच्या राजांना पराभूत करून त्यांच्याकडून याने काही प्रदेश घेतला होता.

रुद्रदामन हा केवळ एक महान विजेताच नव्हता, तर एक सफल आणि योग्य असा शासकही होता. याने आपल्या राज्यांमधून रोगराई, लुटारू, वन्यपशू, आणि अन्य समाजकंटक यांचा पूर्ण बंदोबस्त केलेला होता. हा स्वच्छंद असा राजा नव्हता, तर यमनियमांचे पालन करणारा एक प्रजावत्सल राजा होता. त्याच्या राज्यातील सर्व जातीजमातींनी मिळून याला आपला रक्षक अथवा स्वामी म्हणून मानले होते, असा उल्लेख तत्कालीन शिलालेखात आढळतो. याच्या या लोकप्रियतेचे कारण म्हणजे त्याची प्रजाहिताची आणि लोकरंजनाची दृष्टी. प्रजेच्या कल्याणासाठी तो सतत काळजी वहात असे आणि त्यासाठी कोणतेही कार्य करण्यास तो तत्पर असे. जुनागढ येथील शिलालेखात याच्या लोकहित-भावनेचे एक उत्तम उदाहरण दिलेले आहे. याने सौराष्ट्रात असलेल्या सुदर्शन नावाच्या सरोवराचा बांध पुन्हा नव्याने बांधून काढला होता. या सरोवराच्या पाण्याचा तेथील लोकांना पुष्कळ लाभ होत असे. एकदा बांध फुटल्यामुळे तेथील लोकांना पाण्याची मोठी अडचण निर्माण झाली, तेव्हा ती दूर करण्यासाठी रुद्रदामनने सुदर्शन सरोवराचे पुनर्निर्माण करण्याचा निश्चय केला. परंतु त्याच्या मंत्र्यांनी त्याला आर्थिक कारणां-वरून विरोध केला. तथापि प्रजेचे सर्व कल्याण सतत इच्छिणाऱ्या राजाने या पुण्यकार्याचा भार वैयक्तिरित्या स्वतःवर घेतला. राज्याच्या खजिन्यावर भार टाकला नाही किंवा प्रजेवरही जादा कर लादले नाहीत. तो आपल्या मंत्र्यांच्या चांगल्या सल्ल्यांचे व विचारांचे सदैव स्वागत करीत असे, आणि त्यानुसार निष्ठापूर्वक कार्य करीत असे.

रुद्रदामन संस्कृत भाषेचाही पुरस्कर्ता होता. त्याचे शिलालेख संस्कृत-मध्येच आहेत. त्यावरून त्याचे संस्कृतप्रेम व्यक्त होते. तो स्वतः व्याक-रण, राजनीती, संगीत, न्याय इत्यादींचा थोर पंडित होता. त्याने संस्कृत-मध्ये गद्य आणि पद्य अशा दोन्ही प्रकारची रचना केली होती. याच्या

राजवटीत उज्जयिनीला विद्येच्या राजधानीचाही गौरव प्राप्त झाला होता. भारतातील शक कुलातील राजांमध्ये रुद्रदामन हा एक थोर राजा होऊन गेला यात शंका नाही.

याच्यानंतर मात्र याच्या वंशाचा गौरव दिवसेदिवस क्षीण होत गेला. तथापि याच्या पश्चात या वंशाचे राज्य सुमारे २०० वर्षे अस्तित्वात होते. परंतु एवढ्या दीर्घ कालावधीमध्येदेखील याच्या वंशातील कोणी राजाने कसलीही महत्वपूर्ण अशी कामगिरी केली नाही. ते नावाचेच राजे होऊन गेले. त्यामुळे त्यांच्या कारकिर्दीतील किरकोळ घटनांचे वर्णनही कोणी केलेले नाही. रुद्रदामनाच्या पश्चात त्याचा पुत्र दामजद अथवा दामजदजी हा उज्जैनच्या गादीवर बसला. आपल्या पित्याच्या कारकिर्दीतच याने क्षत्रप या नात्याने आपल्या नावाची नाणी पाडली होती. पिता महाक्षत्रप आणि पुत्र क्षत्रप अशा प्रकारे संयुक्त शासनपद्धती त्याकाळी चालू होती, हे स्पष्ट होते. इ. स. १५०–५१ च्या सुमारास याने आपल्या पित्याचे महाक्षत्रप हे पद स्वीकारले. यात्रया नंतरही शक राजवंशात कितीतरी क्षत्रप आणि महाक्षत्रप होऊन गेले. परंतु त्यांच्या राजवटीला ऐतिहासिकदृष्ट्या काही महत्व नाही.

ईश्वरदत्त नावाच्या आभीर नेत्याच्या नेतृत्वाखाली आभीरांचा समुदाय प्रबळ झाला आणि त्यांनी प्रांताप्रांतांमधून क्षत्रपांचे राज्य हुसकून लावून तेथे आपली सत्ता स्थापण्यास सुरुवात केली. परंतु शकांना पूर्णपणे नष्ट करण्यास आभीरांची शक्तीही पुरी पडली नाही. गुप्त वंशाच्या उदयानंतरही काही काळपर्यंत शक वंशाची शासन-परंपरा कुठेकुठे क्षीण अवस्थेत चालूच होती. अखेरीस चंद्रगुप्त विक्रमादित्य या राजाने शक राजाचा वध केला आणि त्याचे राज्य आपल्या गुप्त-साम्राज्यात समाविष्ट करून टाकले. अशाप्रकारे भारतामधून शकांच्या राजवटीचा अस्त झाला.

□

22507
2219188

# पल्लव

पल्लव राजवंशाचा इतिहास शकांच्या इतिहासाशी इतका मिळून-मिसळून गेलेला आहे की, याचे यथोचित विवरण करणे कठीण होऊन बसले आहे. पल्लवांचा बराचसा इतिहास अज्ञात असाच आहे. त्याची विस्तृत माहिती उपलब्ध नाही. त्यांचा निश्चित कालक्रमही उपलब्ध नाही. तथापि, काही नाणी आणि शिलालेख यांच्याद्वारा पल्लवांच्या इतिहासावर थोडाफार प्रकाश पडतो.

पल्लव राजवंशातील आद्य पुरुष वोनोनीज या नावाचा होता. याने आपली सत्ता येराकोशिया आणि सीस्तान येथे स्थापन केली होती. हा पूर्वी इराणवर राज्य करीत होता. त्याच्या नाण्यांवरून त्याने 'महरजस रजरजस महतस' म्हणजे महाराजाधिराज असे विरुद धारण केले होते, असे दिसते. याच्या नाण्यांवर याचा भाऊ स्पलिराइसिस आणि स्पलहोरिस तसेच याचा भाचा स्पलगदमिस यांची नावे खोदलेली आहेत. यावरून

हे ओनोनिजला त्याच्या राज्यकारभारात मदत करीत होते असे दिसते. कदाचित ते याने जिंकलेल्या प्रांतावर याचे प्रतिनिधी म्हणूनही राज्यकारभार करीत असतील. ओनोनिजने जी नाणी पाडली त्यांवर युक्रेटाइडज आणि त्याचे वंशज या ग्रीकांनी पाडलेल्या नाण्याची छाप स्पष्ट दिसते.

ओनोनिजनंतर स्पलिराइसिस हा त्याचा वारस म्हणून सत्तेवर आला. यानेही आपल्या नावाची नाणी पाडली. याच्या नाण्यांवरून असे अनुमान निघते की, हा पश्चिमोत्तर भारतातील शक वंशातील राजा एजेस याचा हा सम्राट होता. काही नाण्यांवर पुढच्या बाजूला स्पलिराइसिस याचे नाव खोदलेले आहे आणि मागच्या बाजूला खरोष्ट्रि लिपीमध्ये एजेस याचे नाव खोदलेले आहे. यावरून पल्लवांची राजसत्ता त्याकाळी तक्षशिलेपर्यंत पसरलेली होती असे दिसते.

स्पलिराइसिसचा भाऊ स्पलहोरिस यानेही राज्यप्रतिनिधी या नात्याने राज्य केले होते; परंतु त्याची राजवट काही महत्त्वपूर्ण ठरलेली नाही. इण्डो–पार्थियन राजांमध्ये सर्वांत प्रसिद्ध आणि प्रतापी असा राजा गोण्डोफर्नीज होऊन गेला. हा एराकोशियाचा पार्थियन उपशासक होता. उपशासक असताना याचा संबंध एका अन्य शासकाशी होता. त्याचे नाव गुद अथवा गुदन असे होते. हे दोघेही ओर्थैगनीजच्या शासनाखाली उपशासक होते. गोण्डोफर्नीजने हळूहळू आपली शक्ती वाढवली आणि तो सम्राट बनला. याने आपली नाणी पाडली होती. पूर्व इराणवर याची सत्ता होती. पार्थियन साम्राज्यातील बराच प्रदेश याने जिंकून घेतला होता. याच्या नाण्यांवरून असे स्पष्ट होते की, पूर्व इराण आणि पश्चिमोत्तर भारतामधील शक-पल्लव या दोन्ही राज्यांचा हा स्वामी बनलेला होता. याने दुसऱ्या एजेस या शक राजाच्या राज्यातील काही प्रदेश जिंकून घेतला होता. अस्पवर्मन हा दुसऱ्या एजेसचा सरदार होता. परंतु नंतर याने गोण्डोफर्नीजचे मांडलिकत्व स्वीकारले होते आणि त्याला तो करही

देऊ लागला होता. सेंट टॉमस नावाचा प्रसिद्ध धर्मप्रसारक याच्या राज्यात आला होता आणि त्याने याला 'भारताचा राजा' असे म्हटले होते.

सेंट टॉमसने त्याकाळी भारताच्या बऱ्याच भागात प्रवास केला होता, आणि ख्रिश्चन धर्माचा प्रसारही भारतात केला होता. गोण्डोफर्नीज याने ख्रिश्चन धर्म स्वीकारला होता अशी एक आख्यायिका आहे. या ख्रिश्चन संताची समाधी आजही मद्रासजवळच्या एका गावात आहे. याच्या भारतभ्रमणांमुळे गोण्डोफर्नीजची राजवट अधिक प्रसिद्ध झाली. ख्रिश्चन धर्माचा प्रवेश युरोपच्या आधी भारतात झाला होता हे सेंट टॉमसच्या भारतभ्रमणाने स्पष्ट होते. गोण्डोफर्नीज या पार्थियन अथवा पल्लव राजाने इ. स. १९ ते ४५ अशी २६ वर्षे राज्य केले होते.

गोण्डोफर्नीजने आपल्या पराक्रमाने जे साम्राज्य निर्माण केले होते ते बरेच विशाल होते, परंतु त्याच्या पश्चात ते छिन्नभिन्न होऊ लागले. त्याच्यानंतर पश्चिमोत्तर पंजाबमध्ये पकोरस आणि सीस्तानमध्ये सेनेवेरीज याने राज्य केले होते. हे दोघेही गोण्डोफर्नीजचे वारस होते. दोघांच्याही राजवटीत पल्लव राजवंशाची शक्ती क्षीण होत गेली आणि कुशाण लोकांनी भारतामधून पार्थियन राजसत्तेला नष्ट केले.

□



# कुशाण

पल्लवांच्या पाडावानंतर कुशाण लोकांची राजसत्ता भारतावर नांदू लागली. भारतावर ज्या काही परदेशी आक्रमकांनी आक्रमण केले, त्यात सर्वांत अधिक प्रभावशाली कुशाण लोक होते. कुशाणांचा प्राचीन इतिहास चिनी ग्रंथांमधून उपलब्ध होतो. कुशाण ही 'यू-ची' नावाच्या जमातीचीच एक शाखा होती. यू-ची लोक वायव्य चीनच्या कानसू नावाच्या प्रांतात रहात होते. इ. स. पूर्वी १७५ ते १६५ या दशकात ह्युंग–नू जमातीच्या लोकांनी यू–ची जमातीच्या टोळ्यांना चीनमधून हाकून लावले. अशा प्रकारे चीनमधून हुसकून लावल्यानंतर हे लोक पश्चिमेकडे सरकले. तेथे त्यांची आणि 'स्से' अथवा 'शक' यांची गाठ पडली आणि संघर्ष उडाला. या वेळी ऑक्सस् व जग्टार्टस् या नद्यांच्या दुआबामध्ये शकांची रानटी जमात वसत होती आणि त्यांच्या पूर्वेलाच यू–ची

लोकांची पाच संघराज्ये नांदत होती. बौद्ध इतिहासकारांनी यू–ची लोकांना ‘ यक्ष ’ असे म्हटलेले आहे.

या दोन्ही टोळ्यांतील लोक एकमेकांशी सतत झगडत असत. यू–ची लोकांचा आणि इली नदीच्या खोऱ्यात रहाणाऱ्या वू-सुन जमातीच्या लोकांशीही संघर्ष झाला होता. यात यू-ची लोकांचा जय झाला. त्यानंतर हे लोक सर्व दृष्टीने उपयुक्त अशा निवासस्थानाच्या शोधात पश्चिमेकडे आणखी सरकले. यावेळी ही जमात दोन शाखांत विभागली गेली. त्यांपैकी एका शाखेतील लोक दक्षिणेकडे गेले आणि तिबेटच्या सीमेजवळ वसती करून राहिले. या लोकांना ‘ सिआव यू ची ’ म्हणजे छोटी यू-ची जमात असे म्हटले जाऊ लागले. दुसरी पश्चिमेकडेच गेली. हे लोक मुख्य शाखेतील होते. यांनी सरदरियाच्या उत्तरेस रहाणाऱ्या शकांना पराजित केले आणि त्यांची भूमी आपल्या ताब्यात घेतली. परंतु येथूनही त्यांना इ. स. पूर्वी १४० मध्ये वू-सुन जातीच्या लोकांनी ह्युंग-नूचे साह्य घेऊन यू-ची लोकांना येथून हुसकावून लावले. त्यानंतर हे लोक ऑक्सस नदी ओलांडून ताहिया अथवा तुषार या प्रदेशात आले. या प्रदेशातील रहिवासी बहुतेक व्यापारी होते. त्यामुळे त्यांनी यू-ची लोकांची सत्ता स्वीकारली. येथे राहून यू-ची लोकांनी आपली शक्ती वाढविली आणि बाख्त्री येथील लोकांवर हल्ले करण्यास सुरुवात केली. लवकरच त्यांनी त्यांना जिंकले आणि त्याच प्रदेशात ते राहू लागले. त्यावेळी त्यांची जी पाच संघराज्ये स्थापन झाली होती त्यांची चिनी नावे अशा प्रकारची होती : ( १ ) हियू-मी, ( २ ) चुआंग-मो, ( ३ ) कु अेइ चुआंग, ( ४ ) हिथुन, आणि ( ५ ) काओफ़ू. त्या प्रत्येकावर एक ‘ ही-यू ’ म्हणजे ‘ साही ’ अथवा ‘ साहू ’ म्हणजेच सरदार राज्य करीत असे. इ. स. च्या पहिल्या शताब्दीच्या प्रारंभी ‘ कुअेइ-चुआंग ’चे राज्य कुशाण नावाच्या साही अथवा सरदाराला मिळाले. या सरदाराने बाकीच्या चारही राज्यांना

पराजित करून आपल्या अधिकाराखाली आणले. नंतर या सर्वांचे मिळून एक मोठे राज्य निर्माण केले. कुशाण याच्या अधिकाराखाली सगळी यू-ची जमात आल्यानंतर तिला 'कुशाण' असे म्हटले जावू लागले. कुशाण याचे नाव 'कुजुल कदफिस' असेही होते. कुजुल कदफिस याच्या नेतृत्वाखाली कुशाण जातीच्या लोकांमध्ये एक नवीन राजकीय चेतना उत्पन्न झाली. कुजुलने या लोकांना आणखी पुढे सरकण्यासाठी प्रोत्साहन दिले. यात साम्राज्यवाढीची भावना होतीच, शिवाय वाढत्या जनसंख्येला त्यांची भूमी अपुरी पडू लागली होती. या कारणांमुळे कुशाण लोक भारतीय सीमेकडे वळले. त्यांनी हिंदूकुश ओलांडला आणि पार्थियन प्रदेशांवर आपली सत्ता स्थापन केली. काबूल खोरे आणि आराकोशिया हा प्रदेश कुजुलच्या ताब्यात आला. तेथील ग्रीक सत्ता त्याने उखडून लावली. नंतर त्याने गांधार अथवा दक्षिण अफगाणिस्थान जिंकून घेतला. त्याने स्थापन केलेल्या साम्राज्याचा विस्तार त्यावेळी वक्षु म्हणजे ऑक्सस नदीपासून सिंधू नदीपर्यंत होता. भारताच्या वायव्येकडील सीमा प्रांता-जवळील प्रदेश त्यात सामील होता. एवढे प्रचंड साम्राज्य स्थापन केल्या-नंतर कुजुल वृद्धापकाळी मरण पावला. त्यावेळी त्याचे वय ८० वर्षांचे होते. त्याच्या नाण्यांवर त्याने महाराज, महन्त आणि महाराजाधिराज अशा पदव्या धारण केलेल्या होत्या. 'सत्यधर्मस्थित' असे बिरुद याने घेतले होते. या पदव्यांवरून हे स्पष्ट होते की, भारतीय जीवनाचा प्रभाव त्याच्या जीवनावर बराच पडलेला होता.

याच्यानंतर याचा पुत्र वेमा कदफिसेज हा राजा झाला. याने आपल्या साम्राज्याची सीमा भारतापर्यंत विस्तृत केली. याने सिंधू नदी ओलांडून तक्षशिला आणि पंजाब जिंकून घेतला होता. उत्तर प्रदेशातील काही भाग याच्या अधिकाराखाली आलेला होता.

याच्या जीवनावरही भारतीय संस्कृतीची छाप पडलेली होती. त्याच्या

नाण्यांवर 'माहेश्वर' असे शब्द आढळतात. आणि शिव व नंदी यांच्या आकृती खोदलेल्या दिसतात. यावरून कदफिसेज हा धार्मिकदृष्ट्या शैव होता असे स्पष्ट दिसते.

यांच्या पश्चात कुशाणांच्या सिंहासनावर कनिष्क नावाचा राजा आला. कनिष्क हा सर्व कुशाण वंशातील सर्वांत शूर, पराक्रमी आणि प्रभावशाली सम्राट होऊन गेला. भारतीय सम्राटांच्या नामावलीत याचे नाव गौरवाने घेतले जाते. कनिष्काच्या राज्यारोहणाच्या बाबतीत विद्वानांच्यामध्ये मतभिन्नता आहे. इ. स. ७८ मध्ये हा राज्यावर आला असे मानले जाते.

कनिष्क हा असामान्य योद्धा होता. तो महत्त्वाकांक्षी शासकही होता. त्याने आपले साम्राज्य वाढविण्याचा निश्चय केला होता. उत्तर, दक्षिण आणि पूर्व या तिन्ही दिशांना कनिष्काने आपले साम्राज्य वाढविले. प्रथमतः त्याने काश्मीर आपल्या ताब्यात घेतले. तेथे त्याने अनेक नगरे वसविली. कनिष्कपूर म्हणजेच आजचे कनिसपुरा हे काश्मिरमध्ये त्याने स्वतःच्याच नावाने वसविलेले शहर होते. पल्लवाने त्याच्या राज्यावर आक्रमण केले असता त्यांचा पराभव केला होता. साकेत आणि पाटलीपुत्रही कनिष्काच्या अधिकाराखाली आले होते. पाटलीपुत्र जिंकून घेतले तेव्हा कनिष्काची आणि अश्वघोषाची भेट झाली होती. अश्वघोष हा महान बौद्ध पंडित होता. कनिष्काने त्याला आपल्या राजधानीला नेले होते आणि त्याचा सन्मान केला होता. कनिष्काने दोन वेळा चीनशी युद्ध केले होते. पहिल्या वेळी तो असफल ठरला, पण दुसऱ्या वेळी तो विजयी झाला. यावेळी चीनची राजकीय शक्ती फार मोठी होती. परंतु तरीही कनिष्काने त्यांच्यावर हल्ला करून त्यांना नमविले आणि त्यांची खंडणी बंद केली. यारकन्द, खोतान आणि काशगर येथील प्रदेश कनिष्काने आपल्या साम्राज्यात सामावून घेतले. भारताबाहेर आणि भारतामध्ये

अत्यंत विस्तृत प्रदेशावर कनिष्काचे साम्राज्य पसरलेले होते. पश्चिम भारतात शक-क्षत्रपांच्या आधीन जो प्रदेश होता, तो त्याने जिंकलेला होता. सम्राट अशोकानंतर एवढ्या मोठ्या भूभागाचा स्वामी बनणारा, आणि स्वतःला 'देवपुत्र' म्हणवून घेणारा, कनिष्क हाच दुसरा सम्राट होय!

सारनाथ येथील शिलालेखांवरून कनिष्काच्या शासन-व्यवस्थेची कल्पना येते. तो आपल्या या विशाल साम्राज्याचा राज्यकारभार क्षत्रप–शासन-व्यवस्थेच्या द्वारा करीत होता. याच्या साम्राज्यातील पूर्व भाग महाक्षत्रप खरपल्लान आणि क्षत्रप वनस्पर यांच्या शासनाखाली होता. खरपल्लान हा महाक्षत्रप मथुरेत होता आणि वनस्पर हा बनारसचा क्षत्रप होता. कनिष्काची राजधानी पुरुषपूर येथे होती. पुरुषपूर म्हणजेच आजचे पाकिस्तानमधील पेशावर हे शहर होय. कनिष्काने आपल्या राजधानीत अनेक प्रकारच्या भव्य वास्तू बांधल्या होत्या. सार्वजनिक शाळा आणि बौद्ध-विहारही निर्माण केले होते.

कनिष्काने काही काळानंतर बौद्ध-धर्माचा स्वीकार केला होता पुरुषपूर येथे त्याने एक बौद्ध-संघारामही निर्माण केलेला होता. बौद्धाचे एक पवित्र तीर्थस्थान म्हणून हा संघाराम प्रसिद्ध होता. कनिष्काने निर्मिलेल्या चैत्यांचा उल्लेख अलबरुनी नावाच्या प्रख्यात मुस्लीम प्रवाशानेही केलेला आहे. परंतु कनिष्काचा धार्मिक दृष्टीकोन उदार आणि सहिष्णु होता. याच्या साम्राज्यात विविध धर्मांचे अनुयायी सुखा–समाधानाने राहात होते. कनिष्काच्या नाण्यांवरही ग्रीक, इराणी आणि हिंदू देवतांची चित्रे आढळतात. हेराक्लीज, सेरापिज, सूर्य, चंद्र, शिव आणि अग्नी आदी देवतांची ती चित्रे आहेत. कनिष्काच्या राज्यसभेतही सर्व धर्मांतील गुणवान व्यक्तींचा समावेश होता.

प्राचीन भारताच्या इतिहासात कुशाण सम्राट कनिष्क याला एक

निश्चित महत्त्वाचे स्थान आहे. बौद्ध धर्माच्या इतिहासातही याचे स्थान अतिशय गौरवपूर्ण आहे. कनिष्काच्या कारकीर्दीतच चतुर्थ 'बौद्ध संगीति'चे आयोजन झालेले होते. कनिष्काने बौद्ध धर्माचा केवळ स्वीकार केला असे नव्हे, तर त्यातील सिद्धांत समजूनही घेण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी बौद्ध धर्माचे स्वरूप नाना प्रकारच्या वादविवादांमुळे आणि मतमतांतरांमुळे बरेचसे अस्पष्ट झाले होते. तेव्हा धर्माचे मूल स्वरूप लोकांना स्पष्ट व्हावे आणि त्यांना उजाळा मिळावा या हेतूने कनिष्काने ही संगीति आयोजित केली होती. काश्मीरमधील कुण्डलवन विहारात ही चतुर्थ संगीति वसुमित्र नावाच्या बौद्ध महापंडिताच्या अध्यक्षतेखाली भरली होती आणि अश्वघोष हा उपाध्यक्षपदी होता. या ठिकाणी धर्मविषयक बरीच चर्चा झाली. कित्येक महिने ही संगीति सातत्याने चाललेली होती आणि ५०० बौद्ध भिक्षूंनी यात भाग घेतलेला होता. सर्व प्राचीन बौद्धधर्म ग्रंथांचे अध्ययन आणि परिशीलन करून मोठे त्रिपिटक तयार करण्यात आले. या तीन ग्रंथांपैकी 'महाविभाषा' नावाचा बौद्ध सिद्धान्तांचा महान ग्रंथ सर्वत्र ज्ञानकोशाप्रमाणे सन्मानित झाला. चीन-मध्ये हा ग्रंथ आजही उपलब्ध आहे. संगीतीमध्ये तयार करण्यात आलेले सर्व ग्रंथ ताम्रपटावर लिहून ते बौद्ध स्तूपांमधून सुरक्षित ठेवण्यात आले होते. मध्य आशिया आणि चीन या प्रदेशांमधून बौद्ध धर्माचा प्रसार करण्याची एक योजनाही यावेळी आखलेली होती. या सुमारासच बौद्धांमधील 'महायान' नावाच्या पंथाचा पुढे उदय झाला. अवतारवाद आणि भक्ती यांचा समावेश महायान पंथात झाल्याने बौद्ध धर्माचे स्वरूप बरेच बदलून गेले. 'हीनयान' पंथात बुद्धाला केवळ एक शास्ता म्हणूनच स्थान होते, तर महायान पंथाने त्याला देवत्व बहाल केले. त्याला परमात्मा समजून आणि त्याची मूर्ती बनवून बुद्धाच्या पूजेला सुरुवात झाली. राम अथवा कृष्ण यांच्याप्रमाणे बुद्ध हाही एक अवतार

मानला जाऊ लागला. हीनयान पंथ शुष्क आणि सैद्धांतिक होता. त्यातील कडक आचार सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने अनुकूल नव्हते. ज्ञान आणि नैराश्य ह्या सामान्य लोकांच्या शक्तीबाहेरच्या गोष्टी आहेत. सर्वसामान्य लोक अशा इष्ट देवाच्या शोधात असतात की, जो संकट-काळी त्यांच्या जीवनात सहाय्य करील आणि ज्याच्या उपासनेसाठी त्यांना संसाराचा त्याग करावा लागणार नाही. जीवनातील सुखदु:खे, हर्ष-शोक, जय-पराजय, आणि रुदन–हास्य यांचा अनुभव घेत घेतच सामान्य लोकांना ह्या भवसागर तरून जाण्याची इच्छा असते. महायान पंथात या गोष्टींचा समावेश करण्यात आला.

काही दंतकथांच्यामधून असे कळते की, कनिष्काचे निधन दुःखद आणि करुण रूपात झाले. त्याच्या सेनापतींनी त्याच्याविरुद्ध कट करून कनिष्काचा वध केला. त्याचे सरदार आणि सेनापती सततच्या युद्धांमुळे बिथरून गेले होते आणि म्हणूनच त्यांनी रात्रीच्या वेळी कनिष्काची हत्या केली. कनिष्काने २३ वर्षे राज्य केले. इ. स. १०१ च्या सुमारास त्याचा वध झाला.

कनिष्कानंतर कुशाणाच्या सत्तेवर आलेले राजे तेवढे पराक्रमी आणि प्रभावशाली निघाले नाहीत. कनिष्कानंतर त्याचा पुत्र वासिष्क हा राजा झाला, परंतु याच्यासंबंधी प्राचीन इतिहासात काहीच माहिती उपलब्ध नाही. हा अल्पायुषी ठरला आणि कनिष्काचा दुसरा पुत्र ह्युविष्क हा राजा झाला. कल्हण कवीने आपल्या ‘ राजतरंगिणी ’ नावाच्या ग्रंथात ह्युविष्काने काश्मिरमध्ये ‘ हुष्कपूर ’ नावाचे नगर वसविले असे म्हटलेले आहे. याची नाणी सापडली असून त्यावरून आणि शिलालेखांवरून ह्युविष्काने कनिष्काचे साम्राज्य सांभाळले; काबूल, काश्मिर, पंजाब, मथुरा आणि उत्तर प्रदेशाचा पूर्व भाग इत्यादी याच्या अधिसत्तेखाली होता, हे स्पष्ट होते. याची नाणी सुडौल आणि सुंदर होती. याच्याही नाण्यांवर

देवदेवतांच्या प्रतिमा होत्या. एका मुद्रेवर तर धनुष्य हाती घेतलेल्या भारतीय देवतेची प्रतिमा असून 'गणेश' अशी अक्षरे ब्राह्मी लिपीत लिहिलेली आहेत. याच्या एका शिक्क्यावरून हा विष्णुभक्त होता असे मानले जाते. याने सुमारे तीस वर्षे राज्य केले.

हुविष्कानंतर वासुदेव कुशाण हा राजा झाला. याच्या नावावरूनच कळून येते की, कुशाण लोक पूर्णतया भारतीय बनून गेले होते. इ. स. १४५ ते १७६ या काळात याची राजवट झाली. याची नाणी मथुरा, पंजाब आणि उत्तर प्रदेश एवढ्या भागातच सापडलेली आहेत. त्यावरून एवढाच प्रदेश त्याच्या ताब्यात राहिलेला होता आणि कुशाण साम्राज्यातील इतर प्रदेश याच्या हातून गेले होते असे दिसते. याच्या अधिकांश नाण्यांवर शिव आणि नंदी यांच्या प्रतिमा आहेत. नावावरून वासुदेव हा वैष्णव पंथाचा अभिमानी असावा असे वाटले तरी तो शैव होता.

वासुदेव हा कुशाण वंशातील अखेरचा सम्राट झाला. याच्या कारकीर्दीपासूनच कुशाण वंशातील राजवंशाच्या पतनाला प्रारंभ झाला. याच्यानंतरचे राजे पराक्रमहीन निघाले आणि त्यामुळे इतके दिवस दबून राहिलेल्या शक-क्षत्रपांनी पुनःश्च डोके वर काढले. कुशाणांची सत्ता झुगारून दिली. मथुरा येथेही असेच घडले आणि तेथे एक नाग परिवार सत्तारूढ बनला. नागांच्या सत्तास्थापनेने भारतामध्ये एक राष्ट्रीय शक्तीचे वारे वाहू लागले आणि त्यात कुशाण-साम्राज्य वाहून गेले.

कुशाणांचे साम्राज्य प्रचंड होते यात शंकाच नाही. या युगात काही नवीन तत्त्वांचा उदय झाला आणि भारतीय संस्कृतीमध्ये महत्त्वाची भर पडली. धार्मिकदृष्ट्या महायान पंथाची स्थापना ही या काळातील अत्यंत महत्त्वाची घटना होती. साहित्यिक क्षेत्रातही या काळात मोठी कामगिरी झाली. कला, तत्त्वज्ञान, धर्म, वैद्यक इत्यादी क्षेत्रात महत्त्वपूर्ण अशी ग्रंथरचना झाली. संस्कृत भाषेची बरीच उन्नती याकाळी झाली. कनिष्क हा

विद्वानांचा आश्रयदाता होता. त्याच्या कारकीर्दीत 'बुद्धचरित्र' हे महाकाव्य अश्वघोष पंडिताने लिहिले. अश्वघोष हा एक मोठा तत्वज्ञ, कवी, नाटककार आणि संगीतज्ञ होता. 'सारिपुत्र' प्रकरण, व 'वज्रसुत्रि' या नाटकांची रचनाही अश्वघोषाने केली होती.

नागार्जुन नावाचा प्रसिद्ध तत्वज्ञ याच काळी झाला. 'मध्यमककारिका,' 'सुहृल्लेखा' हे याचे दोन प्रसिद्ध ग्रंथ आहेत. याचा जन्म विदर्भातील एका ब्राह्मण कुटुंबात झाला होता. तो अनेक शास्त्रांत पारंगत होता. महायान पंथाचा तात्विक पाया घालण्यात याचा मोठा हातभार होता. यानेच प्रथम महायान पंथावर ग्रंथ लिहिला.

वसुमित्र नावाचा प्रसिद्ध तत्वज्ञदेखील याच काळी झाला. तसेच चिकित्सा शास्त्रावर विख्यात ग्रंथरचना करणारा चरक याच काळात होऊन गेला. हा कनिष्काचा राजवैद्य होता असे म्हणतात. याच्या ग्रंथाचे अनुवाद प्राचीन काळातच अरबी आणि फारसी भाषेत झाले होते. चरकाने प्रतिपादिलेले चिकित्सा-शास्त्र आणि सिद्धान्त आजच्या वैज्ञानिक युगातही महत्वाचे मानले जातात.

कनिष्काला विविध प्रकारच्या कलांची आणि कलापूर्ण वास्तूंची निमिती करण्याची आवड होती. त्याने पुरुषपूर राजधानीत चारशे फूट उंचीचा आणि तेरा मजले असलेला एक मनोरा बांधलेला होता. त्याच्यावर एक लोखंडाचा प्रचंड आकाराचा कळसही बनवलेला होता. त्या काळातील ही एक भव्य आणि सुंदर अशी वास्तूनिर्मिती होती. या मनोऱ्याजवळच बौद्ध-विहार होता. बौद्धधर्माच्या शिक्षणाचे मोठे केंद्र तेथे होते. चिनी यात्रेकरूनी या विहाराचा उल्लेख केलेला आहे. कनिष्काने अनेक सुंदर नगरेही वसविली.

याच सुमाराला गांधार-कलेचा विकास झाला. बुद्धाची मूर्तीपूजा या कालापासून रूढ झाली. त्यामुळे अनेक मूर्ती घडविल्या जाऊ लागल्या.

मूर्तीकलेत त्यावेळी ग्रीक लोक निष्णात होते. ग्रीकांची कला आणि भारतीय कल्पना यांचा सुरेख संगम होऊन 'गांधार कले'चा जन्म झाला. या काळात तयार झालेल्या बऱ्याच मूर्ती गांधार प्रदेशात आढळतात. भारतीय विषय आणि ग्रीक शैली हे गांधार कलेचे वैशिष्ट्य आहे; म्हणून हिला 'इण्डोयूनानी बौद्धकला' असेही म्हणतात. गौतमबुद्धाचे जीवनप्रसंग अशा प्रकारच्या मूर्तीतून आणि चित्रांतुन चित्रित केलेले आहेत. मथुरा हे येथील त्या काळातील एक प्रमुख केंद्र होते. येथेही या काळात बुद्ध आणि बोधिसत्व यांच्या प्रतिमा तयार करण्यात आल्या. मथुरेच्या मूर्ती-कलेवर गांधारकलेचा प्रभाव पडलेला आहे. मथुरेच्याजवळ शिक्री नावाच्या ठिकाणी लाल दगड बऱ्याच मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. त्यामुळे मूर्ती बनविण्यासाठीही त्याचा उपयोग मथुराकलेत केलेला दिसतो. भरहूत आणि साची येथील स्तूप आणि त्यांवरील कला आणि मथुरा-कलाशैली यांचा निकटसंबंध आला.

या कालखंडाविषयी पं. जवाहरलाल नेहरू यांनी लिहिले आहे की, " कुशाणांच्या साम्राज्याचा इतिहास पुष्कळ दृष्टींनी लक्षात घेण्यासारखा आहे. हे बुद्धधर्मीय साम्राज्य होते. त्यापैकी विख्यात राज्यकर्ता सम्राट कनिष्क याची या धर्मावर विशेष निष्ठा होती. पेशावरातील राजधानी-पासून जवळच तक्षशिलानगरी वसली होती आणि येथे फार प्राचीन काळापासून बुद्ध-संस्कृतीचे मोठे केंद्रच होते. हे कुशाण लोक मंगोलियन किंवा त्यांचेच भाईबंद होते. त्यामुळे स्वाभाविकच या कुशाणांच्या राज-धानीपासून त्यांच्या मूळ मंगोलियन भूमीपर्यंत ये-जा चालू असली पाहिजे; आणि त्यातून बुद्ध-संस्कृती व बुद्ध-विद्या चीन आणि मंगोलिया-पर्यंत जाऊन पोचल्या असल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे पश्चिम आशियातील प्रदेशांचाही बुद्धांच्या विचार परंपरेशी अत्यंत निकट संबंध आला असला पाहिजे. तेथे जी मूळची ग्रीकांची व आशियातील स्थानिक संस्कृति

होती, तिचे भारतीय बुद्ध-संस्कृतीशी अशारीतीने याकाळी मिश्रण झाले.

"अशा रीतीने चीन आणि पश्चिम आशिया यांच्यावर हिंदुस्थानचा परिणाम घडून आला, परंतु तसाच हिंदुस्थानवरही त्यांचा परिणाम झाला. कुशाणांचे साम्राज्य हे एखाद्या राक्षसाप्रमाणे–पश्चिमेच्या बाजूला ग्रीक व रोमन लोकांचे साम्राज्य, पूर्वेच्या बाजूला ग्रीस व चीन साम्राज्य आणि दक्षिणेच्या बाजूला दक्षिण हिंदुस्थानचा प्रांत—यांमध्ये असलेल्या साऱ्या आशियाच्या प्रदेशावर जेठा मारून पसरले होते. एका बाजूने अर्धवट हिंदी आणि अर्धवट रोमन, तर दुसऱ्या बाजूने अर्धवट हिंदी व अर्धवट चिनी असे या महाराक्षसाचे रूप होते. अथवा एका बाजूने हिंदुस्थान आणि रोम व दुसऱ्या बाजूने हिंदुस्थान आणि चीन या दोहोंच्या मधली एक प्रकारची ही धर्मशाळा किंवा टप्प्याची जागा म्हटले तरी चालेल.

"अशारितीने मध्यवर्ती स्थान प्राप्त झालेले असल्यामुळे हिंदुस्थान आणि रोम यांचे अत्यंत निकट संबंध येण्याला त्या राज्याचा उपयोग झालेला असला पाहिजे. ज्यूलिअस सीझर हयात होता तो रोमन प्रजासत्ताक राज्याचा शेवटचा काळ, आणि त्यानंतरचा रोमन साम्राज्याचा २०० वर्षांचा काळ हाच या कुशाण साम्राज्याचाही काळ होय. कुशाणांच्या महान सम्राटांचा वकील ऑगस्टस् सीझरच्या दरबारी होता असे म्हणतात. दोन्ही देशांत खुष्कीच्या मार्गाने आणि जलमार्गाने व्यापार भरभराटीस आला होता. हिंदुस्थानातून रोमकडे जाणाऱ्या पदार्थांत अत्तरे, मसाल्याचे जिन्नस, रेशमाचे कपडे व कापड, जरतारी माल, किनखाब, मलमल, जरीचे कापड आणि हिरेमाणकादी जवाहीर हे पदार्थ असत. प्लिनी नावाच्या रोमन ग्रंथकाराने तर रोममधून हिंदुस्थानकडे सोने नुसते धुऊन नेले जात आहे अशी खास तक्रार केलेली आहे. हिंदुस्थानच्या या चैनीच्या पदार्थांपायी रोमचे सालीना १० कोटी सेस्टर्स खर्ची पडतात असे त्याने म्हटले आहे. याची किंमत सुमारे दीड कोटी रुपये किंवा

१० लाख पौंड होईल.

"या काळात बुद्ध-भिक्षूंच्या मठात आणि बौद्ध-संघाच्या सभांमध्ये मोठे वादविवाद आणि चर्चा चालत असत. दक्षिणेकडून आणि पश्चिमेकडून नवेनवे विचार किंवा जुनेच विचार पण नव्या पोषाखात येऊ लागले होते आणि त्यांच्यामुळे बुद्धांच्या साध्यासुध्या विचारपरंपरेत हळूहळू बदल होऊ लागला होता. असा बदल होता होता शेवटी बुद्ध-धर्मियांचे दोन वेगवेगळे पंथ पडले. एक महायान ( म्हणजे मोठे वाहन ) आणि दुसरा हीनयान ( म्हणजे छोटे वाहन). या नवनव्या कल्पना किंवा जुन्या कल्पनांवर बसविलेले नवनवे अर्थ यामुळे धर्म आणि जीवन यांबद्दलची दृष्टीच हळूहळू बदलत गेली आणि या कल्पनांचे कला आणि शिल्प यांमध्ये व्यक्त होणारे स्वरूपही असेच पालटत गेले. हे बदल कसकसे होत गेले हे सांगणे तितके सोपे नाही. बुद्धांच्या विचारपरंपरेला धक्का देऊन तिला दुसऱ्या एका दिशेला वळविण्याचे कार्य मुख्यत: दोन संस्कृतींच्या परिमाणामुळे, दाबामुळे घडले असले पाहिजे. एक ब्राह्मण-संस्कृती व दुसरी हेलनिक म्हणजेच ग्रीक-संस्कृती. या दोन्ही भिन्न संस्कृतींचा परिणाम मात्र एकच झाला.

"बुद्ध धर्म हे जातिभेद, भिक्षुकशाही आणि कर्मकाण्ड यांच्याविरुद्ध केलेले एक बंड होते. गौतमबुद्धाला मूर्तीपूजा मान्य नव्हती. आपल्याला लोकांनी देव मानावे आणि आपली पूजाअर्चा करावी असे त्याचे केव्हाच म्हणणे नव्हते. तो आपल्याला फक्त बुद्ध-म्हणजे ज्याला ज्ञान झालेले आहे असा-एवढेच म्हणत असे. अशी विचाराची मांडणी असल्यामुळे तिला अनुसरून बुद्धाच्या प्रतिमा तयार केल्या नव्हत्या, एवढेच नव्हे, तर त्याकाळच्या शिल्पकार्यात सर्वच प्रकारच्या मूर्ती किंवा प्रतिमा तयार करण्याचे टाळण्यात येत असे, परंतु ब्राह्मणधर्मीयांच्या मनातून हिंदू धर्म व बुद्ध धर्म यांच्यामधील अंतर नाहीसे करावयाचे होते; म्हणून बुद्धाच्या विचार

परंपरेत आपल्या कल्पना व आपल्या धर्मांची प्रतीके घुसविण्याचा ते नित्य प्रयत्न करीत असत. वरे, ग्रीक आणि रोमन या जगातील कारागीर घेतले, तरी यांनाही त्यांच्या प्रतिमा करण्याची सवय होतीच. त्यामुळे हळूहळू बुद्धधर्मीय मंदिरात मूर्ती–प्रतिमा-यांचा शिरकाव झाला. प्रथम प्रथम या मूर्ती बुद्धाच्या नव्हत्या, तर बोधिसत्त्वांच्या होत्या. बुद्ध धर्माच्या परंपरे-प्रमाणे हे बोधिसत्व म्हणजे बुद्धाचेच पूर्वीचे अवतार होत. परंतु ही पद्धत वाढता वाढता खुद्द बुद्धापर्यंत येऊन थडकली आणि त्याच्याही प्रतिमा करण्यात येऊ लागल्या व त्यांचे पूजनही होऊ लागले. हे बदल महायान पंथाला मान्य होते. महायान पंथ ब्राह्मण-विचारपद्धतीला अधिक जवळ होता. कुशाण सम्राटांनी हा महायान पंथ स्वीकारला आणि त्याचा प्रसार करण्याचे कार्य केले; परंतु त्याचा अर्थ ते हीनयान पंथाचा किंवा इतर धर्मांचासुद्धा द्वेष करीत असत, असे मात्र मुळीच नव्हे. कनिष्काने तर झरथुष्ट्राच्या धर्मालाही प्रोत्साहन दिल्याचे सांगतात.

"महायान पंथ आणि हीनयान पंथ यांच्यांत श्रेष्ठ कोणता आणि कनिष्ठ कोणता याबद्दलचे जे मोठमोठे वादविवाद विद्वानांच्यामध्ये होत ते मोठे वाचण्यासारखे आहेत. या कामासाठी बौद्ध संघाच्या मोठ्या प्रचंड सभा होत असत. कनिष्काने काश्मिरमध्ये सर्व संघांचे मिळून एक असे सम्मेलन भरविले होते. या प्रश्नाबद्दलच्या चर्चा व वाद कित्येक शतके होत राहिले. त्यात महायानांचे वर्चस्व उत्तर हिंदुस्थानात वाढले आणि हीनयानांचे दक्षिण हिंदुस्थानात वाढले; परंतु अखेरीस हिंदू धर्माने दोघां-नाही आपल्यात पचवून टाकले. आज बुद्ध धर्माचा महायान पंथ चीन, जपान व तिबेट यांमध्ये प्रचलित आहे आणि हीनयान पंथ सिलोन व ब्रह्मदेश यांमध्ये आहे.

"कला ही कोणत्याही समाजाच्या मनाचे खरेखुरे प्रतिबिंब आहे; त्यामुळे बुद्ध धर्माचा पहिला साधेपणा जाऊन त्याच्याजागी जसजसा

विविध प्रकारचा कृत्रिम सायासांनी साधलेला प्रतीकवाद आला, तसतशी हिंदी कलाही अधिकाधिक संमिश्र गुंतागुंतीची आणि अलंकारपूर्ण होऊ लागली. विशेषत: वायव्येकडील गांधार प्रदेशातील महायान पंथीयांच्या शिल्पकलेत तर अलंकार आणि मूर्तींचा सफाईदार कोरीवपणा यांचा फार मोठा भर उसळला. प्रत्यक्ष हीनयान पंथीयांच्या शिल्पकलेलासुद्धा या नव्या प्रवृत्तीपासून स्वतःला सर्वस्वी अलिप्त ठेवता आले नाही. हळूहळू त्यांच्यामधील मूळच्या पद्धतीतील साधेपणा आणि संयम यांचा लोप झाला आणि तेही भरदार नक्षीकाम व प्रतिमानिर्मिती करू लागले. या काळच्या शिल्पाचे नमुने आजही आपल्याला उपलब्ध आहेत. अजिंठाच्या लेण्यांमधील काही काही भिंतीवरील सुंदर चित्रांचे नमुने हे त्यात सर्वांत जास्त लक्षात घेण्यासारखे मनोवेधक आहेत.

" कुशाण लोक हे शकांप्रमाणे किंवा इतर तुर्की लोकांप्रमाणे परकी म्हणून हिंदुस्थानात आले नाहीत किंवा हिंदुस्थानात परकीयांनी जेते म्हणून जेत्यांवर राज्य करावे तसे राज्यही त्यांनी केले नाही. त्यांच्यामध्ये आणि हिंदुस्थानच्या लोकांमध्ये समान धर्मांचे बंधन तर होतेच, परंतु त्याशिवाय त्यांनी हिंदुस्थानातील राज्यव्यवस्थेचे सिद्धान्तही स्वीकारले होते. अशाप्रकारे आर्यांच्या जीवनपद्धतीशी ते पुष्कळ अंशांनी समरस झाल्यामुळेच उत्तर हिंदुस्थानात जवळजवळ तीनशे वर्षेपर्यंत त्यांना राज्य करता आले. "

BVBK-0402271

म. वं. मं. ठाणे, ... शाखा.
... क्र. २२८७ ... २२१७०१८
विषय ...